
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १०८
www.ramprahar.com
सोमवार, ४ नोव्हेंबर २०२४ ◆पाने ८◆किंमत ₹२

## विधानसभा निवडणूक : आज स्पष्ट होणार लढतींचे चित्र



**मुंबई :** राज्याच्या विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मुदत २९ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आली, तर अर्ज मागे घेण्यासाठी ४ नोव्हेंबर ही अंतिम तारीख आहे. त्यानंतर राज्यातील लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे. १८ तारखेपर्यंत प्रचारासाठी १५ दिवसांचा अवधी मिळणार आहे. दिवाळी हा सर्वांत मोठा सण असल्याने सर्वच पक्षांनी आपापल्या कार्यकर्त्यांना कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद घेण्यास सांगितले आहे तसेच नागरिकही दिवाळी साजरी करण्यात मग्न असून सुट्टीचा आनंद घेत आहेत. त्यामुळे दिवाळीनंतर पुढील दोन आठवडे राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. प्रचार कालावधीत सुटीचा रविवार महत्त्वाचा असतो. या कालावधीत १० व १७ नोव्हेंबरला रविवार आला आहे.

**अंतरंग**
- ट्रेंडिंगच्या नावाने लाखोंचा गंडा; गुन्हा दाखल/२
- महायुतीची आमदार म्हणून काम करेन -मंत्री तटकरे/५
- टीम इंडियाचा सलग तिसरा लाजिरवाणा पराभव/८

# लाडक्या बहिणींना लखपती करणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीसाठी रविवारी (दि. ३) कुर्ल्यातून प्रचाराचा नारळ फोडला. शिवसेना उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पहिली जाहीर सभा घेतली. या वेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर जोरदार प्रहार करीत २३ नोव्हेंबर रोजी राज्यात बॉम्ब फुटणार आहे, असा इशारा दिला, तर दुसरीकडे लाडक्या बहिणींना दर महिन्याला भाऊबीज मिळणार असून लाडक्या बहिणींना लखपती झालेले पहायचे आहे, असेही म्हटले.





मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लाडकी बहिणीला पैसे देणारे गुन्हेगार असल्याचे म्हणत आहेत. असे असेल तर हा गुन्हा मी १० वेळा करण्यास तयार आहे. मते घेतल्यानंतर तुम्ही माघार घेता, पण मी असे करणार नाही. जे बोलणार ते करणार. राजस्थान, हिमाचल प्रदेशमध्ये यांनी लोकांची फसवणूक केली. कर्जमुक्ती करेन सांगितले आणि विसरले. तिथे शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. चुकून छापले गेले असे ते म्हणाले, पण आम्ही असे करणार नाही, कारण बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांची आम्हाला शिकवण आहे. आम्ही लोकांना फसवणार नाही.

आम्ही लोकांमध्ये जाऊन काम करणारे लोक आहोत. घरी बसून फेसबुक लाईव्ह नव्हे; तर फेस टु फेस काम करणारे आहोत. आम्ही लाडक्या बहिणींना १५०० देऊन थांबणार नाही. हे पैसे आम्ही वाढवणार आहोत. आता आचारसंहिता लागली आहे. विरोधकांना वाटले की, नोव्हेंबरचे पैसे मिळणार नाहीत, त्याच्या आधारे सरकारविरोधात बोंब मारण्याची संधी मिळेल, पण आम्हाला विरोधी चलाख आहेत याची माहिती होती. आम्ही ऑक्टोबरमध्येच नोव्हेंबरचे पैसे देऊन टाकले. यामुळे त्यांची बोलती बंद झाली, असा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला.

२० तारखेला निवडणूक संपताच लाडकी बहीण योजनेचे डिसेंबरचे पैसे जमा होणार अशी घोषणाही या वेळी मुख्यमंत्र्यांनी केली. पुढे ते म्हणाले, आम्हाला लाडक्या बहिणीला सुरक्षित करायचे आहे. लाडकी आणि सुरक्षित बहीण देण्याचे काम आमचे आहे. १५००, २००० नाही तर लाडक्या बहिणीला राज्यात लखपती होताना आम्हाला पहायचे आहे. हे डबल इंजिन सरकार सर्वसामान्यांचे आहे. आम्ही देणारे लोक आहोत. आम्ही नोव्हेंबरचे पैसे ॲडव्हान्स दिले, कारण आमचे ॲडव्हान्स देणारे हे सरकार आहे. पाच हफ्ते सगळ्यांच्या खात्यात आले. आम्ही हफ्ते भरणारे असून मागचे सरकार हफ्ते वसूल करणारे होते. हाच फरक असून आम्ही देना आणि ते लेना बँक आहेत. म्हणून दोन वर्षांत इतके काम केले आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हणत विरोधकांवर निशाणा साधला.

## जितेंद्र आव्हाडांचे आक्षेपार्ह विधान; भुजबळांचा पलटवार



**मुंब्रा : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, मुंब्रा-कळव्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका जाहीर सभेला संबोधित करत असताना उपमुख्यमंत्री अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह विधान केले. त्यानंतर उपमुख्यमंत्री पवार यांच्या वतीने अनेकांनी पुढे येऊन आव्हाड यांच्यावर टीका केली आहे.

मुंब्र्यात एका सभेत बोलत असताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, अजित पवारांचा गट हा पाकिटमारांची टोळी आहे. जर तुमच्यात हिंमत होती, तुम्ही मर्दाची औलाद होता, तर मग तुम्ही स्वतःचे वेगळे चिन्ह घेऊन निवडणूक लढवून दाखवायला हवी होती. मग आम्ही तुम्हाला मर्द समजले असते.

जितेंद्र आव्हाड यांच्या विधानाचा समाचार घेताना छगन भुजबळ म्हणाले, आव्हाड यांनी याआधीही अनेकदा चुकीच्या शब्दांचा वापर केला होता, ज्यामुळे ते अडचणीत आले होते. माझा त्यांना सल्ला आहे की, शब्द वापरण्याबाबत त्यांनी जाणीवपूर्वक विचार केला पाहिजे. तुमच्याबरोबर जे २० ते २५ वर्ष राहिले, त्यांना सर्वांना हे विधान लागू होते.

# मैथिली ठाकूरच्या सुमधूर गायनाने दिवाळी संध्या कार्यक्रमात भरले रंग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुप्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर हिने आपल्या सुमधूर आवाजाने खारघरमध्ये आयोजित दिवाळी संध्या कार्यक्रमात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून दाद दिली.





दिवाळी सर्वत्र आनंदात साजरी होत असताना श्री. रामशेठ ठाकूर विचार मंचच्या वतीने खारघर सेक्टर १२मधील गावदेवी मैदानात दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. २) करण्यात आले होते. अल्पावधीतच आपल्या गायकीचा ठसा जनमानसाच्या मनावर उमटवणाऱ्या दिल्ली येथील सुप्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर हिने या कार्यक्रमात आपल्या सुरेल गायनाने खारघरवासीयांना मोहित केले.

### खारघरकरांचा उत्तम प्रतिसाद

या कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, किर्ती नवघरे, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, भाजप खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका आरती नवघरे, रूचिता लोंढे, हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, भाजप शहर सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष साधना पवार, **(पान २ वर..)**

## निवडक

### श्रीनगरमध्ये स्फोट; १५ जण जखमी

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरची राजधानी श्रीनगरमधील अत्यंत गजबजलेल्या लाल चौकात दहशतवाद्यांनी रविवारी (दि. ३) ग्रेनेडचा स्फोट घडवून आणला. या स्फोटात किमान १५ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर सुरक्षा दलाने स्फोट झालेला संपूर्ण परिसर सील केला आहे.

### समीर खान यांचे निधन

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांचे जावई, मुलगी निलोफर खानचे पती समीर खान यांचा कुर्ल्यात एका रुग्णालयाबाहेर भीषण अपघात झाला होता. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर रविवारी (दि. ३) त्यांचे निधन झाले. चालकाकडून थार गाडी घेऊन येताना ब्रेकऐवजी ॲक्सिलेटरवर पाय पडून खान यांना धडक बसली होती.

### राज ठाकरे यांच्या सभा

**मुंबई :** मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे राज्यातील पहिली जाहीर सभा सोमवारी (दि. ४) कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मनसेचे विद्यमान आमदार राजू पाटील यांच्यासाठी घेणार आहेत, तर याच दिवशी दुसरी सभा ठाणे येथील ब्रम्हांड चौकात होणार आहे.

# एक लाख मतांच्या फरकाने माझा विजय निश्चित -आमदार रविशेठ पाटील

**पाली : प्रतिनिधी**

पेण सुधागड रोहा मतदारसंघात प्रतिस्पर्धी असलेले उमेदवार एक फॉरेन रिटर्न, तर दुसरा उपरा उमेदवार आहे. त्यामुळे एक लाख मतांच्या फरकाने माझा विजय निश्चित असल्याचा विश्वास महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते प्रचारादरम्यान माध्यमांशी बोलत होते.

शिवसेना उबाठा पक्षाची मंडळी मला येऊन भेटतात व सांगतात आम्ही किती वर्षे शिवसेनेत आहोत आम्हाला उमेदवारी नाही, पण नव्याने प्रवेश केलेल्या उमेदवाराला तिकीट दिले जाते हे आम्हाला मान्य नाही, तर दुसरे उमेदवार फॉरेन रिटर्न. त्यांना मतदारसंघातील प्रश्न लगेच कसे समजणार, असा सवाल आमदार रविशेठ पाटील यांनी केला.



देशावर आणि राज्यावर कोरोनाचे संकट होते. त्यामुळे विकासकामांना वेळ अपुरा पडला, परंतु राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार सत्तेत आल्यावर विकासकामांना मोठी गती मिळाली. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते अजित पवार सत्तेत सहभागी झाल्याने महायुती अधिक मजबूत झाली. याशिवाय पूर्वी शेकापकडे असलेले धैर्यशील पाटील आज भाजपसोबत असल्याने माझ्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे, असे आमदार रविशेठ पाटील यांनी नमूद केले.

माझ्या मतदारसंघात आदिवासी, कातकरी बांधव मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी आजवर भरीव निधी दिला. आदिवासी बांधवांशी माझे जणू रक्ताचे नाते असून भाऊ समजून विकासासाठी माझे योगदान राहील, तर लाडकी बहीण योजनेचा विधानसभा निवडणुकीत आम्हाला फायदाच होणार आहे, असा दावा आमदार रविशेठ पाटील यांनी केला.

भाजप एकसंघ आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी माझ्यासोबत आहेत. तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांची मला मोठी साथ मिळत आहे. शिवसेनेचे उमेदवार संजय म्हात्रे हे आपला अर्ज कायम ठेवणार नाहीत. ते महायुतीला मदत करतील, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

### विविध विकासकामे

मतदारसंघात केलेल्या विकासकामांमध्ये पेण तालुक्यातील खारेपाट विभागात रस्ते, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना व पूल, सुधागड तालुक्याच्या आदिवासी भागातील रस्ते, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना आदी विविध प्रकारची विकासकामे केली आहेत. मतदारसंघात दोन वर्षात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केल्याची माहिती देऊन आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकरच गतीने मार्गी लागेल. इतरही प्रलंबित प्रश्न व समस्या पुढील पाच वर्षात निकालात निघतील. आम्ही ४० ते ५० वर्षांपासून जनतेशी नाळ जोडून आहोत. आमचा दरवाजा सर्वसामान्य जनतेसाठी दिवसरात्र खुला आहे. त्यामुळे जनता मला निश्चितपणे साथ देईल.

## भाऊबीज सण उत्साहात



**अलिबाग : प्रतिनिधी**

वसुबारसपासून सुरू होणारा दिवाळी हा सण तसा देव दिवाळीपर्यंत साजरा होत असतो, पण नरकचतुर्दशी ते भाऊबीज या तीन-चार दिवसात खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी होते. त्यातील भाऊबीज हा सण रविवारी (दि. ३) रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरा झाला.

घरोघरी प्रसन्न वातावरण, जल्लोष होता. लाडक्या भाऊरायासाठी मांसाहार करणाऱ्यांच्या घरात तिखटाचा बेत होता. झणझणीत रस्सा, काळजी फ्राय, भेजा असे खाण्याचे प्रकार अगदी लज्ज़तदार होते. त्यामुळे भाऊ आणि बहीण दोघे ही अगदी खुषीत होते.

भावा-बहिणीच्या अतूट नात्याची साक्ष देणारे रक्षाबंधन आणि भाऊबीज हे दोन सण होय. या वर्षी भाऊबीज ऐन रविवारी सुट्टीच्या दिवशी आली. तत्पूर्वी नरकचतुर्दशीच्या दिवशी अभ्यंगस्नान करून दिवाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन, शनिवारी दिवाळी पाडवा आणि रविवारी भाऊबीज असा चार-पाच दिवस दिवाळीचा सण साजरा झाला. यानिमित्ताने घरोघरी लाडू, चकली, करंजी, शंकरपाळी असे फराळाचे नानाविध प्रकार करण्यात आले होते.

या सणाच्या निमित्ताने प्रत्येक बहिणीने भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करून त्याचे औक्षण केले आणि त्याच्याकडून मिळणाऱ्या भेटवस्तूचा प्रेमाने स्वीकार केला. यात मोल पैशाचे नव्हते, तर त्यातील प्रेमाचे होते.

# दिवाळीच्या सुट्टीत काशीद, मुरूड बीच पर्यटकांनी फुलले

## जंजिरा किल्ला पाहण्यासाठीही गर्दी; स्थानिकांना रोजगार उपलब्ध

**मुरूड : प्रतिनिधी**

दिवाळी सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील काशीद, मुरूड बीचवर पर्यटकांची गर्दी जमल्याचे दिसून आले. अभ्यंगस्नानाची पहिली अंघोळ आणि लक्ष्मीपूजनाची पूजा उरकून मुंबई, पुणे, ठाणे, पश्चिम महाराष्ट्रातून असंख्य पर्यटक दीपावली सुट्टी समुद्रकिनारी एन्जॉय करण्यासाठी डेरेदाखल झाले आहेत.



नवरात्रोत्सवापर्यंत या भागातील पर्यटन पूर्ण थंडावले होते. त्यामुळे पर्यटन व्यावसायिक कमालीचे हवालदिल झाले होते. परतीचा पाऊस लांबल्याने जंजिरा जलदुर्ग उशिरापर्यंत बंद होता. म्हणून तिकडेही पर्यटक जात नव्हते. परिणामी पर्यटन व्यवसायिक हताश दिसून येत होते, परंतु दिवाळी पाडव्याच्या दिवसापासून चित्र बदलून काशीद, मुरूड आदी समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांचा पूर लोटल्याचे चित्र दिसत आहे.

पर्यटक आल्याने पर्यटन व्यवसायाला पुन्हा उर्जितावस्था आली आहे. हजारोंच्या संख्येने पर्यटकांची मांदियाळी समुद्रकिनारी आनंद लुटण्यासाठी उतरली आहे. ठिकठिकाणी निवास व्यवस्था, हॉटेलिंग गजबजून गेले आहेत. पर्यटकांची सुमारे एक हजार वाहने परिसरात दाखल झाल्याचे काशीद येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम, मुरूड येथील हिरा रेसिडेंसीचे मालक महेंद्र पाटील, साईगौरी रेस्ट हाऊसचे मालक आणि जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले. पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर फटाके फोडून दिवाळीचा आनंद लुटल्याचेही श्री. बैले यांनी सांगितले. दिवाळी सुट्टी असल्याने पर्यटकांची हजेरी स्थिर राहील, असा अंदाज आहे.

पर्यटकांच्या वर्दळीने जंजिरा जलदुर्ग गजबजला आहे. राजपुरी जेट्टी, खोरा बंदर जेट्टी, दिघी बंदर जेट्टीवरून पर्यटकांना जंजिऱ्यात जाण्याची जल प्रवासाची सुविधा असून असंख्य पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी येत आहेत. सध्या हवामान उत्तम व पर्यटनाला अनुकूल आहे. शनिवार व रविवार या दोन दिवसांत जंजिरा किल्ला पाहण्यासाठी सुमारे पाच हजार पर्यटकांनी भेट दिली असल्याची माहिती पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.

**(रायगडातील पर्यटनस्थळे हाऊसफुल्ल/पान २ वर..)**


## मनोज जरांगेंकडून उमेदवार जाहीर

**जालना : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी (दि. ३) आपल्या सहकाऱ्यांची अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होती. या बैठकीत काही जागांबाबत प्राथमिक चर्चा झाली.

मनोज जरांगे यांनी दसरा मेळावा घेऊन त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट केली होती. त्यानंतर आता त्यांनी निवडणूक लढवण्यासाठी मतदारसंघांची घोषणा केली, तर काही जागांवर उमेदवारांना पाडण्याची भाषा बोलून दाखवली. त्यामुळे त्यांच्या उमेदवार यादीकडे लक्ष लागले आहे.

## चिकन, मटण विक्रेत्यांच्या दुकानासमोर ग्राहकांच्या रांगा



पूर्वी तिखटाचा बेत फार वर्षातून मोजक्याच दिवशी व्हायचा, पण आता चिकन सेंटर, चायनीज सेंटर, ढाबे, छोटी हॉटेल्स गल्लोगल्ली वाढल्यामुळे मांसाहारी लोकांना केव्हाही आपल्या आवडत्या जेवणाचा बेत आखता येतो. त्यामुळे त्याचे महत्त्व कमी झाले असे म्हटले जाते, परंतु विशेष सण साजरे करताना चिकन, मटण सेंटर दुकानात होणारी गर्दी पाहून तो गैरसमज दूर होतो.

भाऊबीजेच्या पार्श्वभूमीवर रविवारी चिकन, मटण सेंटरसमोर ग्राहकांच्या रांगा पहायला मिळाल्या. विशेष म्हणजे शनिवारी संध्याकाळपासूनच विक्रेते ग्राहकांच्या प्रतीक्षेत होते आणि रविवारी पहाटे आपल्या मेहुण्याच्या पाहुणचारासाठी भावोजी चिकन, मटणाच्या दुकानासमोर रांगेत उभे राहिले. मच्छीविक्रेत्यांकडेही ग्राहकांची गर्दी दिसून आली. त्यामुळे मांस, मासळीचा भाव वधारला होता. तरीही लोकांनी जादा पैसे देऊन खरेदी केली.

# पनवेल, उरण परिसरात दिवाळीनिमित्त विविध कार्यक्रम

## ‘दिवाळी पहाट’ने नवीन पनवेलकर मंत्रमुग्ध







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्कर्ष सांस्कृतीक कला आणि क्रिडा मंडळाने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करून नवीन पनवेलकरांची गोड पहाट केली. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

दरवर्षी दिवाळी सणानिमित्त दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन उत्कर्ष सांस्कृतीक कला आणि क्रिडा मंडळाच्यावतीने करण्यात येते. त्यानुसार स्वर संस्कार प्रस्तुत दिवाळी पहाट या मराठी हिंदी गितांच्या सुरेल मैफिलीचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. नवीन पनवेलमधील के.बा.बांठीया हायस्कुलच्या हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. या वेळी उपस्थित कलाकारांनी अपल्या सुरेल गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

अॅड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांच्या वतीने या सुरेल संगीत गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, सुशीला घरत, ज्येष्ठ नेते सी.सी.भगत, जगदीश घरत, विजय म्हात्रे, राकेश भुजबळ, प्रशांत फुलपगार, सुरेखा भुजबळ, प्रशांत भुजबळ, हेमंत भुजबळ, प्रीती भुजबळ, चंद्रकांत सोनवणे, मच्छिंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



**खारघर : दिया फॉर युनिटी अर्थात एक दिवा एकतेचा असा संदेश देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, साधना पवार यांच्या हस्ते दिवे प्रज्वलित करण्यात आले.**

## आदिवासी बांधवांना फराळाचे वाटप



**उरण : बातमीदार**

श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार व कार्यांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक बांधिलकी जपत आदिवासी बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

उरण तालुक्यातील चिरनेर येथील अक्कादेवी वाडी येथे आदिवासी बांधवांना फराळ वाटप करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माधव म्हात्रे, कुमार ठाकूर तर अध्यक्षस्थानी बेलपाडाचे सामाजिक कार्यकर्ते महेश पाटील उपस्थित होते.

या मान्यवरांच्या हस्ते दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. दिवाळीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत श्री. छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेने फराळ वाटपाचा कार्यक्रम केला आहे. संस्था नेहमी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविते व सर्वांना मदतीचा हात देते, असे गौरवोद्गार या वेळी अध्यक्ष महेश पाटील यांनी सांगितले. संस्थेच्या कार्याविषयी शिक्षक सनी दिलीप बोरसे यांनी ओळख करून दिली.

शेवटी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी उपस्थित सर्वांचे तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सनी बोरसे, संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, ओमकार म्हात्रे, प्रेम म्हात्रे, कुमार ठाकूर, भाविक पाटील, सुविधा म्हात्रे, शुभम ठाकूर, माधव म्हात्रे, सानिका म्हात्रे, मुकेश म्हात्रे, समीर पाटील, प्रकाश म्हात्रे आदींनी विशेष मेहनत घेतली.

## पनवेलमधील कट्टा परिवाराने साकारला पन्हाळा किल्ला

◆ *आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक*



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले किल्ले हे आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार पुढील प्रेरणादायी ठरावे यासाठी पनवेलमधील कट्टा परिवाराच्या वतीने पन्हाळा किल्ल्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. कट्टा परिवाराचा हा उपक्रम राबवण्याचा यंदाचे पाचवे वर्ष आहे. या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन कट्टा परिवाराच्य उपक्रमाचे कौतुक केले.

विरूपाक्ष मंदिरासमोर कट्टा परिवार पनवेलतर्फे २०२०पासून अनेक तरुण मुलमुली मिळून किल्ला बनवण्याची परंपरा जोपासत आहेत. त्यानुसार याही वर्षी कट्टा परिवार तर्फे पन्हाळा किल्ला उभारण्यात आला आहे. ह्यासाठी विशेष मेहनत अथर्व गोखले, तन्मय समेळ, सुमेध गाडगीळ यश जोशी ह्याच्यासह कट्टा परिवारातील सदस्यांनी घेतले.

दरम्यान, कट्टा परिवारातील सदस्य सिद्धेश गोडबोले ह्याच्या मातोश्रींचे नुकतेचह निधन झाल्याने यंदा आकर्षक सजावट न करण्याचे आणि थोडक्यात किल्ला बनवून छत्रपती शिवाजी महाराजांप्रती आदर व्यक्त करण्यात आला तसेच पुढीलवर्षी अजून चांगल्या पद्धतीने आणि मोठ्या प्रमाणात कट्टा परिवार नवीन किल्ला घेऊन तो साकारण्याचा प्रयत्न करेल असा निर्धार केला. या वेळी श्रीनंद पटवर्धन, पत्रकार संजय कदम, उमेश इनामदार यांच्या कट्टा परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## उरणमध्ये मॉर्निंग ग्रुपतर्फे गीत गायन



**उरण : बातमीदार**

मॉर्निंग ग्रुप उरणतर्फे उरण शहरातील विमला तलाव येथे दीपावली पाडवा पहाट कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. विविध मान्यवरांनी गीत गाऊन सर्वांची दिवाळी गोड केली. सर्वांना मंत्र मुग्ध केले.

या वेळी प्रकाश मेहता, बबन पाटील, वैभव म्हात्रे, नितीन पडते, आहिरे सर, गणेश ढोले, उरणकर, मनोज म्हात्रे, विकास ठाकूर, आनंद बुधे, प्रवीण भाई, पाटील अप्पा, मनिष म्हात्रे, दीपक शिगवण, प्रदीप, कल्पेश, नितीन कासारे, मनोज सुतार, गणेश घरत, उत्तम बुंधे, घनश्याम कडू, माऊली, योगेश मोटे, राजेंद्र म्हात्रे, जोशी आदी उपस्थित होते.

सर्वांना फराळ देऊन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाची प्रस्तावना बबन पाटील यांनी तर आभार वैभव म्हात्रे यांनी मानले.

## रसायनी ब्राह्मण सभेतर्फे संगीत कार्यक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी ब्राह्मण संघाने शनिवारी (दि.२) दिवाळी पहाट हा भक्तीगीत, नाट्यगीत, शास्त्रीय संगीत यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात कलाकारांनी गाणी सादर केली. या रसायनी संघाचे संस्थापक हे डॉ. विलास कुलकर्णी आहेत तर गेले दोन वर्षे अध्यक्ष म्हणून बी. एस. कुलकर्णी असून संघ नेहमीच विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. गायन शकुन आपटे, विष्णू जोगळेकर, गौरी बागुल, अदिती नगरकर, आंचल रावत, साथसंगत तबला राकेश कुलकर्णी, संवादिनी ऋतुजा कर्वे कुंटे, की बोर्ड साहिल सोमण, टाळ दीपक पुंडले आणि निवेदिका संध्या कुलकर्णी यांनी केले.





**पनवेल : दैनिक दि म्हसळा टाइम्सच्या संतसाहित्य दिवाळी अंकाचे आणि संजीवन लहरी गुजरात संत साहित्य विशेषांकाचे प्रकाशन भाऊबीजेच्या दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दि म्हसळा टाइम्स संस्थापक रमेश पोटले, संत साहित्यिक मनोहर मांदाडकर, पत्रकार मधुकर रिकामे, महादेव म्हात्रे, रमेश पाखड, स्वागत पोटले, निवृत्त पोलीस अधिकारी गोपी पाटील आदी उपस्थित होते.**

























## भाऊबीज

**पनवेल : भाऊबीज म्हणजे भाऊ बहिणीच्या पवित्र नात्यातील गोडवा वाढवणारा आणि प्रेम वृद्धिंगत करणारा सण. हा सण रविवारी उत्साहात साजरा झाला. यानिमित्त शिवाजीनगर येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच भरतशेठ ठाकूर, श्रीधरशेठ ठाकूर आणि नारायण ठाकूर यांना त्यांच्या बहिणींनी ओवाळून भाऊबीज सण साजरा केला. या वेळी अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, तुलसाबाई घरत, पदुबाई म्हात्रे, प्रमिला वास्कर यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते.**

## संपादकीय

# प्रचाराला येणार वेग

राज्यातील विधानसभा निवडणुकीला आता खऱ्या अर्थाने रंग चढणार आहे, कारण सोमवार ही अर्ज माघारीची अंतिम मुदत असून कोण माघार घेणार आणि कोण अर्ज कायम ठेवणार याचा निर्णय झाल्यावर लढतींचे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर प्रचाराला वेग येणार आहे.

**प्रकाशपर्व म्हणून ओळखली जाणारी दिवाळी महाराष्ट्रासह देशभर मोठ्या उत्साहात साजरी झाली. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि शेवटी भाऊबीजेने याची सांगता झाली. त्यामुळे गेले काही दिवस बंद असलेला प्रचार सोमवारपासून नव्या जोमाने सुरू होणार आहे. दिवाळीत जाहीर प्रचार बंद होता. या दिवसांमध्ये उमेदवारांनी दिवाळीला प्राधान्य देतानाच नागरिकांशी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून संवाद साधला. उमेदवार अर्ज माघारीचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर प्रचाराला खऱ्या अर्थाने वेग येणार आहे. विविध राजकीय पक्षांचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते आता पायाला भिंगरी लावून प्रचाराची राळ उडवून देतील. निवडणुकीमध्ये जाहीर प्रचार महत्त्वाचा असतो, कारण यामध्ये थेट मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांच्याशी संपर्क साधला जातो. आपण केलेली कामे आणि भविष्यात काय काय करणार याचा लेखाजोखा यानिमित्ताने सादर केला जातो. त्याचप्रमाणे मतदारांच्या प्रश्न, समस्या जाणून घेतल्या जातात. याशिवाय प्रचारासाठी सभांवर भर दिला जातो. आपल्या पक्षाचे बडे नेते, स्टार प्रचारक यांना आमंत्रित करून सविस्तरपणे भूमिका जाहीर केली जाते. विरोधकांचा समाचारही घेतला जातो. त्यामुळे त्याची रंगत वेगळी असते. अलीकडच्या काळात सोशल मीडियाचा वापर सर्वांकडून मोठ्या प्रमाणात केला जातो. हेच लक्षात घेत या माध्यमावरूनही एकाच वेळी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहचत त्यांना आकर्षित केले जाते. अधिकाधिक मतदारांना आपल्याकडे वळवणे हेच ध्येय निवडणुकीत असते. त्यासाठी प्रचाराचा धुरळा अर्ज माघारीनंतर उडणार आहे. अर्ज माघारीचा सोमवारी शेवटचा दिवस असल्याने बंडखोरी केलेल्या उमेदवारांना थंड करण्यासाठी युद्धपातळीवर सर्वच राजकीय पक्षांकडून प्रयत्न सुरू आहेत. स्वपक्षाचा, सहकारी पक्षाचा उमेदवार अडचणीत येऊ नये याकरिता बंड केलेल्यांची समजूत काढली जात आहे. त्यांना आगामी काळात संधी देण्याचे आश्वासनही दिले जात आहे. या संदर्भात बड्या नेत्यांच्या उपस्थितीत बैठका सुरू आहेत. कोण उमेदवारी माघार घेणार आणि कोण अर्ज कायम ठेवणार याचा फैसला सोमवारी दुपारपर्यंत होणार आहे. त्यानंतर लढतींचे चित्र स्पष्ट होईल. मग प्रचाराला वेग आणि धार येईल. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी असा प्रमुख सामना आहे. महायुती सरकारने विविध योजना, निर्णय, उपक्रम राबवले आहेत, तर विरोधक यावर टीका करीत आहे. विशेषत: लाडकी बहीण योजनेची विरोधकांनी धास्ती घेतलेली दिसते. सरकारने या योजनेचा नोव्हेंबर महिन्याचा हप्ता ऑक्टोबर महिन्यासोबतच अदा करून महिलांना आधीच भाऊबीज दिली होती. त्यामुळे दिवाळीत महिलांमध्ये उत्साह दिसून आला. दिवाळी आता सरली आहे. आता लोकशाहीचा उत्सव अर्थात विधानसभा निवडणुकीला रंग चढणार आहे. सध्या वातावरणात उष्णता असून लवकरच गुलाबी थंडी पडणार असल्याचा अंदाज आहे. अशा वेळी राजकीय वातावरण मात्र तापणार एवढे नक्की!**

# वडिलोपार्जित 'वारसदारी'मुळे बहीण-भावाचे नाते तुटले

खबरबात
विजय मांडे

बहीण-भावाचं नातं म्हटलं की ते अगदी शेवटपर्यंत असायचं, मात्र मध्यंतरी जमिनीचे दर वाढले आणि 'वारसदार' म्हणून हक्क गाजविण्याच्या नादात बहीण-भावाचं नात तुटले. ते इतके विकोपाला गेले की, रक्षाबंधन आणि भाऊबीज कायमच्या बंद झाल्या. इतकेच नव्हे तर तोरण आणि मरणदारीसुद्धा येणे-जाणे बंद झाले. मामा-भाचा आदी नातीगोतीही आयुष्यभरासाठी बंद झाली.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. त्या वेळी शेतजमीन घरातील असलेल्या कर्त्या पुरुषाच्या नावावर असे. मग कितीही भाऊ, बहिणी असल्या तरी घरातील प्रमुख म्हणून त्या कर्त्या पुरुषाच्या नावावर जमीन असली तरी कुणीही त्यावर आक्षेप घेत नसे. ही जमीन सर्व कुटुंबातील माणसे कसत असत आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करीत असत. कालांतराने दळणवळणाची सोय झाली आणि ग्रामीण भागातील अनेक जण मुंबई-पुणेकडे नोकरीसाठी जाऊ लागले.

पूर्वी कोकणात मनी ऑर्डरची वाट पहावी लागत होती. आता उलट झालय. सरकारने काही जमिनी भूसंपादित केल्याने जमिनीला भाव आला. काही ठिकाणी रेडी रेकनरच्या चार पट भाव मिळाल्याने मुंबईत असलेल्या भावाचा किंवा लग्न होऊन गेलेल्या बहिणीचा हक्क जागा झाला. त्यामुळे आयुष्यभर काबाडकष्ट करून जीवन जगणाऱ्या कोकणातील शेतकऱ्याचे चुकले की काय?



असे वाटू लागले, कारण जमीन-जुमला, घर कोकणात राहणाऱ्या भावाकडे सोपवून मुंबईत अगदी ऐशारामात राहणाऱ्या भावाची त्या जमिनीतील हिस्सा मिळावा म्हणून धडपड सुरू झाली. इतक्या वर्षात जमीन पिकवून किती कमावले असतील? असा अंदाजही हे मुंबईला मजा करणारे भाऊ करू लागले. त्याला त्याच्या अर्धांगिनीची साथही आहे. दुसरीकडे बहिणीच्या मनात जरी आपल्या काबाडकष्ट करणाऱ्या भावाला हक्कसोड पत्र देऊन जमीन द्यावीशी वाटत असली तरी तिला तिच्या पतीच्या भूमिकेच्या विचार करावा लागल्याने काही ठिकाणी कलह, तर काही प्रकरणांमध्ये कोर्ट कचेऱ्या सुरू झाल्या आणि इतकी वर्षे जपलेले भावा-बहिणींचे नाते संपुष्टात आले. त्यामुळे रक्षाबंधन आणि भाऊबीजेला तिलांजली मिळाली हे कटू सत्य आहे.

हे झाले कोकणातील. मुंबईजवळ असलेल्या ठाणे व रायगड जिल्ह्यात तर वेगळाच अनुभव येतो. साधारण बारा-पंधरा वर्षांपूर्वी जमिनीचे दर गगनाला मिळाले, अगदी तिप्पट चौपट झाले. विशेषतः रायगड जिल्ह्यात मुंबईकर शेतकऱ्यांनी फार्महाऊससाठी जमिनी घेणे सुरू केले. त्यासाठी त्यांनी एजंट नेमले आणि व्यवहार होऊ लागले. उदाहरण द्यायचे झाल्यास कर्जत, खालापूर तालुक्यासाठी जमीन-खरेदी विक्री करण्यासाठी कर्जतच्या तालुक्याच्या ठिकाणी एकच रजिस्टर ऑफिस होते. तेथे नोंदणी करण्यासाठी येणाऱ्यांची संख्या इतकी वाढली की, तीन-चार दिवस नंबर लागत नसे, म्हणून खालापूरला वेगळे व नेरळला वेगळे रजिस्टर ऑफिस सुरू करावे लागले.

सर्व व्यवस्थित व्हावे म्हणून गावातील किंवा त्या भागातील एखादा एजंट शोधून त्याच्या करवी व्यवहार करण्याची सुरुवात झाली. यामुळे तालुका तालुक्यात तसेच गावागावात एजंट तयार झाले. त्यातील काहींनी अनेकांना फसवले, तर काही कोर्ट कचेरी केल्यामुळे जेलची हवा खाऊन आल्याची उदाहरणेही खूप आहेत. असे असले तरी एजंट वाढतच आहेत. अनेकांनी यामध्ये पैसे कमाल्यावर किमती गाड्या, टुमदार बंगले, अंगावर अंगभर दागिने केले. त्यांनतर नोटाबंदी आणि कोरोनाच्या काळात त्या बंगल्यांची अवस्था बघण्यासारखीच झाली होती. कित्येकांच्या गाड्या हप्ते न भरल्याने ओढून नेल्या होत्या, तर काहींना अंगावरील दागिने सराफांकडे गहाण ठेवण्याची वेळ आली.

विकत घेतलेल्या जमिनी नावावर करताना कित्येकजण आवल्या संख्या भावाला व बहिणीला विसरले काहींनी पैशांचा हव्यासापोटी आपल्या भाऊ, बहीण, आत्या, काकांना जीवंतपणीच स्वर्गात घालविले आहे, तर पूर्वी घरातील कर्त्या व हुशार कुटुंबातील सदस्याच्या नावावर सर्व जमिनी असायच्या मात्र विकताना अन्य भावांचा किंवा वारसांचा विचार न करता जमीन विकून आपलीच तुंबडी भरण्याचा प्रकारही अनेक ठिकाणी घडला आहे. जमिनीच्या किमती वाढल्याने भावा भावांमधून विस्तव जात नाही तर भावा-बहिणींचे नाते संपुष्टात आले असून अनेक जण एकमेकांची तोंडेही बघत नाहीत. त्यामुळे जमिनींचे दर वाढले वडिलोपार्जित वारसदारीच्या नादात रक्षाबंधन व भाऊबीज यासारख्या पवित्र परंपरेला तिलांजली मिळाली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आल्यापासून महिलांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे त्या असता मुख्यमंत्र्यांच्या बहिणी झाल्यापासून भाऊसुद्धा त्यांच्यापासून थोडे वचकून आहेत. त्यामुळे यापुढे वडिलोपार्जित जमिनी मिळण्याची अडचण थोडी दूर होईल असे वाटत असले तरी भाऊसुद्धा काही कमी नाहीत हे खरे...

# भारतीय गणितज्ज्ञ शकुंतलादेवी

चालत्या बोलत्या गणिती यंत्र अशी शकुंतलादेवी यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म ४ नोव्हेंबर रोजी १९२९ रोजी बंगळुरूमध्ये झाला. त्यांच कुटुंब म्हणजे पारंपरिक कन्नड ब्राह्मण, पण शकुंतलादेवी यांचे वडील नव्या युगातले. त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.

शकुंतलादेवीचे वडील सर्कसमध्ये काम करत होते. तीन वर्षांच्या शकुंतलाला पत्त्याचे खेळ शिकवताना तिच्या अफाट स्मरणशक्तीचे त्यांना ज्ञान झाले. त्यांनाच शकुंतलादेवीमधील झपाट्याने गुणाकार-भागाकार करण्याची शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतलाचेच रोडशो करू लागले. वयाच्या सहाव्या वर्षी शकुंतलाने म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले. शकुंतलादेवी १९४४मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६ साली आपल्या अमेरिका दौऱ्यात



त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली. इ.स. १९७७मध्ये डलास विद्यापीठात शकुंतलाचा मुकाबला तत्कालीन सर्वात जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतलादेवीने एका २०१ अंकी संख्येचे २३वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्युटरला ६२ सेकंद लागले. १८ जून १९८०मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते.

शकुंतलादेवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार करून दाखवत केवळ २८ सेकंदामध्ये १८९४७६६८१७७९९५४२६४६२७७३७३० हे उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतलादेवी यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये विराजमान झाले. शकुंतलादेवी यांच्या अंगी एक अदभुत प्रतिभा होती की अख्ख्या भारतास त्याची दाखल घ्यावी लागली. २०१३ सालच्या एप्रिल महिन्यात वयाच्या ८३व्या वर्षी बंगळुरूमध्ये शकुंतलादेवी यांनी अखेरचा श्वास घेतला आणि हा जगप्रसिद्ध ह्युमन कॉम्प्युटर काळाच्या पडद्याआड झाला. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# सहा अब्ज डॉलर्सच्या आयफोन्सची भारतातून निर्यात

अमेरिकेतील दिग्गज स्मार्टफोन निर्माता कंपनी ॲपल गेल्या काही वर्षांपासून त्यांचे चीनवरील अवलंबित्व



कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. ॲपल कंपनी आयफोन निर्मितीसाठी चीनऐवजी भारतावर लक्ष केंद्रित करत आहे. कंपनीच्या या प्रयत्नांना यश आलं आहे तसेच भारताचंही त्यांना उत्तम सहकार्य लाभत असल्याचं चित्र सध्या पहायला मिळत आहे. यामुळेच या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यांत आयफोनच्या एकूण निर्यातीत एक तृतीयांश वाढ झाली आहे. याचाच अर्थ ॲपलचं भारतातील उत्पादन वाढलं आहे. अमेरिकेने भारतातील उत्पादन वाढवून चीनमधील उत्पादन कमी करण्यावर भर दिला आहे.

यामध्ये म्हटलं आहे की, ॲपलने भारतात बनवलेले सहा अब्ज डॉलर्स किंमतीचे आयफोन निर्यात केले आहेत. याद्वारे आयफोनच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत एक तृतीयांश वाढ झाली आहे. यावरून असं दिसतंय की, आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये ॲपल १० अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीचे आयफोन निर्यात करेल. ॲप्पलने भारतातील उत्पादन वाढवण्यावर भर दिला आहे. कंपनी त्यांच्या उत्पदानाचा वेग वाढवण्यावर, उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष देत आहे. स्थानिक अनुदान, कुशल कामगार व उत्तम तांत्रिक पाठबळाच्या जोरावर कंपनीचा भारतात विस्तार होत आहे.

कंपनीला चीनवरील अवलंबित्व कमी करायचं आहे आणि त्यात त्यांना भारताचा हातभार मिळत आहे. वॉशिंग्टन व बीजिंगमधील वाढता तणाव, करोना काळात अमेरिकेला बसलेला मोठा आर्थिक फटका, यांसारख्या कारणांमुळे अमेरिकेतील कंपन्यांना त्यांचं चीनवरील अवलंबित्त्व दूर करायचं आहे. त्यामुळे अमेरिकेतील अनेक मोठमोठ्या कंपन्यांनी भारताकडे मोर्चा वळवला आहे. आयफोन कंपनीने भारतात उत्पादन सुरू करणं हा त्याचाच एक भाग आहे.


दरम्यान, अलीकडच्या काळात भारत देश एक महासत्ता म्हणून उदयास येत आहे. अनेक देशांनी भारताबाबतचे आपले धोरण बदलले आहे. जागतिक बाजारपेठेत भारताचे महत्त्व वाढल्याचे दिसून येते.

# आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके

रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचा ४ नोव्हेंबर १८४५ रोजी जन्म झाला. त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतिकारक म्हणाले जाते.

वासुदेव फडके यांचे आजोबा नजीकच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच त्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले. माध्यमिक शिक्षण संपल्यावर ते पुण्याला आले व सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा सेवेत भरती झाले. १ येथे असताना त्यांच्यावर महादेव गोविंद रानड्यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे होती असे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके हे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेंच्याही प्रभावात होते. साळव्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सहभागी करून घेणे महत्त्वाचे असल्याचे फडक्यांना पटवून दिले.

सन १८७९नंतर वासुदेव फडके यांच्या कार्याला सुरुवात झाली. त्यांनी सशस्त्र पद्धत अवलंबली. यानंतर त्यांनी सरकारविरुद्ध उठाव करण्याची तयारी सुरू केली. फडके अक्कलकोट स्वामी समर्थांकडे आशीर्वाद मागण्यासाठी गेले, कारण ते दत्त उपासक होते. त्यांनी दत्तमहात्म्य हा सात हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला तसेच स्वरचित दत्त स्तोत्रही लिहिले. स्वामी समर्थ



निमित्त

आणि फडके यांची भेट अक्कलकोटला झाली होती.


प्रारंभिलेल्या कार्यात फडके माघार घेऊ शकत नव्हते. अखेर त्यांनी ती तलवार घेतली. स्वामींना साष्टांड दंडवत घातले व पुढील प्रवासी निघून गेले. मग महाराष्ट्रातील तथाकथित मागासलेल्या जातींमध्ये मदत शोधली. मांग, रामोशी, धनगर, कोळी आणि इतर अनेक समाजातून त्यांनी तरुण घेतले व त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देऊन आपल्या सैन्यात भरती केले. अशा काहीशे सैनिकांसह त्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध अधिकृतरीत्या युद्धाची घोषणा केली. शिरुर आणि खेड तालुक्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकून फडक्यांच्या सैन्याने आपला चरितार्थ चालवला. त्यानंतर त्यांनी थेट पुण्यावर चाल केली आणि काही दिवसांकरिता शहरावर कब्जा मिळवला. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला चढवून इंग्रज सरकारचे लक्ष विकेंद्रित करण्याच्या त्यांच्या चालीला यश मिळाले नाही आणि इंग्रज सरकारने भारतातील हा पहिला सशस्त्र उठाव चिरडण्याचा चंग बांधला. घानूर गावाजवळ झालेल्या हातोहातच्या लढाईनंतर भारतीयांत फितुरी लावण्यासाठी सरकारने फडक्यांना पकडून देण्याबद्दल इनाम जाहीर केले. याला प्रत्युत्तर म्हणून फडक्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पकडून देणाऱ्यास त्याहून मोठे इनाम जाहीर केले. याचबरोबर साप-किरड्यांना मारल्यावर मिळणाऱ्या बक्षिसाप्रमाणे प्रत्येक युरोपीय व्यक्तीला मारण्याबद्दलही त्यांनी इनाम जाहीर केले.

२३ जुलै १८७९ रोजी विजापूरजवळील देवर नावडगी या गावाच्या बाहेर एका बौद्ध विहारामध्ये गाढ झोपेत असताना त्यांना अटक करण्यात आले व पुण्याच्या तुरुंगात ठेवले. तेथे त्याच्यावर खटला चालवण्यात आला. फाशीची शिक्षा टळून त्यांना आजीवन कारावास व तडीपारीची शिक्षा झाली. येमेन देशातील एडन येथील तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडक्यांनी एके दिवशी आपल्या कोठडीचे दार बिजागऱ्यांसकट उचकटून काढून तुरुंगातून पळ काढला. काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांना परत पकडले व पुन्हा तुरुंगात टाकले. तेथे आपल्याला मिळत असलेल्या वागणुकीविरुद्ध वासुदेव बळवंत फडक्यांनी आमरण उपोषण केले व त्यांचा १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मृत्यू झाला. **(साभार विकिपीडिया)**

क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : दिवाळीनिमित्त बोर्ली पंचतन येथील शिवप्रताप ग्रुपने किल्ले सिंहगडाची प्रतिकृती सादर केली आहे. कलाकार विनायक पयेर, साहिल गाणेकर, सुजल पयेर, सनी पयेर, वेदांत पाटील, स्मित पयेर यांनी या हा गड साकारला आहे.** (छाया : अमेय नाझरे)



## आरोग्य प्रहर

# पोटाची चरबी वाढतेय? 'ही' पद्धत एकदा वापरून पाहा

पोटाची चरबी कमी करण्यासाठी आज आपण ५-२०-३० या पद्धतीची ओळख करून घेणार आहोत. या पद्धतीमध्ये आठवड्यातून पाच दिवस २० मिनिटे वजन उचलणे आणि ३० मिनिटे चालणे याचा समावेश आहे. जर तुम्ही चांगल्या जेवणाबरोबर हे सातत्याने केले तर तुमचे बेली फॅट्स कमी होतील, असे फॅट लॉसतज्ज्ञ जॉन विल्यम्स म्हणाले.



**दिवस एक आणि चार**

२०-मिनिटांचे सर्किट ट्रेनिंग, ३० मिनिटांच्या कामासाठी टाईमर सेट करा व १५ मिनिटे विश्रांती घ्या, अप्पर बॉडी व शरीराच्या प्रत्येक भागासाठी एक व्यायाम निवडा, चेस्ट-पुश-अप्स, बॅक-डंबेल रो, शोल्डर- शोल्डर प्रेस, ट्रायसेप डंबेल किकबॅक्स, बायसेप- बायसेप कर्ल्स.

**दिवस दोन आणि पाच**

लोअर बॉडी (पायांसाठी पाच व्यायाम निवडा)

स्क्वाट्स, वॉकिंग लंजेस, साईड लंजेस, सिंगल लेग ब्रिज, सिंगल लेग ब्रिज.

**दिवस तीन (कार्डिओ)**

क्रंच, बाईसिकल, प्लँक, साईड प्लँक, साईड प्लँक.

डॉ. कपिल कुमार कुर्सीवाल, वरिष्ठ सल्लागार, जीआय शस्त्रक्रिया, जीआय ऑन्कोलॉजी, बॅरिएट्रिक आणि मिनिमल प्रवेश शस्त्रक्रिया, धरमशिला नारायण हॉस्पिटल, दिल्ली यांनी बेली फॅट्स कमी करण्यासाठी ५-२०-३० पद्धत ही एक हाय-इंटेन्सिटी इंटरव्हल ट्रेनिंग स्ट्रॅटेजी आहे, जी जास्तीत जास्त फॅट बर्न करण्यासाठी मदत करते, असे सांगितले.

यात इंटरवल्सचे पाच राऊंड आहेत, ज्यात प्रत्येकी ३० सेकंदाचा कमी तीव्रतेचा व्यायाम (जसे की जॉगिंग किंवा जलद चालणे), २० सेकंदांचा मध्यम-तीव्रतेचा व्यायाम (जसे की धावणे किंवा सायकल चालवणे) आणि ५ सेकंदांचा उच्च-तीव्रतेचा स्फोट (जसे. धावणे).

फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य यांसारख्या वनस्पती आधारित पदार्थांवर लक्ष केंद्रित करा. मासे आणि लो-फॅट डेअरी प्रोडक्ट्स यासारखे प्रथिनांचे स्त्रोत निवडा. प्रोसेस्ड मांस, तसेच मांस आणि जास्त फॅट्स असलेले दुग्धजन्य पदार्थ, जसे की चीज आणि बटरमध्ये आढळणारे फॅट्स मर्यादित करा. मध्यम मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स निवडणे. हे फॅट्स मासे, नट्स आणि विशिष्ट वनस्पती तेलांमध्ये आढळतात.

# माणगाव येथे महायुतीची आढावा व नियोजन बैठक

## पाच वर्षे महायुतीची आमदार म्हणून काम करेन -ना. तटकरे





**माणगाव : प्रतिनिधी**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा पवार गट), आरपीआय व मित्रपक्ष महायुतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा व नियोजन बैठक शनिवारी (दि.२) कुणबी भवन हॉल माणगाव याठिकाणी उत्साहात झाली.

या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना श्रीवर्धन मतदार संघाच्या महायुतीच्या उमेदवार तथा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपण सर्वांनी या निवडणुकीत एक दिलाने काम करून गेल्या अडीच वर्षात महायुतीच्या सरकारमार्फत राबविलेल्या लोकाभिमुख योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून महायुतीची उमेदवार म्हणून मला मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे सांगत पुढील पाच वर्षे महायुतीची आमदार म्हणून मी काम करणार असल्याचे सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निवडणूक येत्या २० नोव्हेंबर रोजी होत असून त्या अनुषंगाने माणगाव कुणबी भवन येथे महायुतीच्या प्रमख कार्यकर्त्यांची आढावा व नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मतदार संघाच्या महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांनी महायुतीच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या बैठकीला शिवसेनेचे राज्य प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे, भाजपचे ज्येष्ठ नेते संजयआप्पा ढवळे, तालुका प्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, माणगाव नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर, भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी तालुकाध्यक्ष संगीता बक्कम, माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, संदीप खरंगटे, राजेश मेहता, जिल्हा भाजपचे युवा नेते उमेश साटम, भाजपचे तालुकाध्यक्ष गोविंद कासार, राष्ट्रवादीचे माणगाव शहराध्यक्ष नितीन वाढवळ, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते, शिवसेनेचे शहर प्रमुख सुनील पवार, माजी नगरसेवक सिराज परदेशी, आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, महायुतीचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना आदिती तटकरे पुढे म्हणाले की, येणाऱ्या दिवसांत आपण माणगावात प्रभाग निहाय प्रचार दौरा करून एक दिवस महायुतीची सर्व व्यापाऱ्यांना, नागरिकांना सोबत घेत प्रचार रॅली काढू, असे नियोजनबद्ध आपण सर्वांनी काम केले तर मतदारांपर्यंत पोहचल्याचा आनंद सर्वांना मिळेल. महायुतीच्या सरकारने आपल्या अडीच वर्षाच्या काळात विविध योजना आणल्या. महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, वयोवृद्धांसाठी वयोश्री योजना अशा अनेक योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून महिलांना दरमहा १५०० रुपये सरकारने सुरू केले असून हि योजना कायम स्वरूपी सुरू राहणार आहे.

**'आदितीताईंना भरपूर मताधिक्याने विजयी करा'**

**जिल्हा भाजपचे युवा नेते उमेश साटम यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना महायुती सरकारमार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देऊन प्रत्येक कार्यकर्त्याने आपले बूथ सक्षम करून आदिती ताईंना भरपूर मताधिक्याने विजयी करण्याचे आव्हान त्यांनी केले. या आढावा व नियोजन बैठकीचे सूत्रसंचालन माणगाव नगरीचे माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव यांनी केले.**

माणगाव शहरातील जवळपास ९० टक्के महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून ही योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. माणगाव नगरीत नगरपंचायतीची इमारत, सुधारित पाणी योजना याना आपण मंजुरी दिली असून आत्तापर्यंत विविध विकासाची कामे तटकरे साहेबांच्या माध्यमातून व आपण सर्वांनी केलेली आहेत. महायुतीतील कार्यकर्त्यांच्या कोणत्याही सूचना असतील तर त्यांनी मन मोकळ्यापणाने माझ्यापर्यंत पोहचवाव्यात असेही त्या म्हणाल्या. शिवसेनेचे राज्य प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे यांनी माणगाव शहरातील प्रलंबित विकास कामे उमेदवार आदिती तटकरे यांच्या समोर ठेवताना सांगितले की, माणगाव शहराला पुराच्या पाण्याचा कोणताही धोका नसताना माणगावकरांवर निळी रेषा शासनाकडून लादण्यात आली आहे ती निळी रेषा काढून टाकण्यात यावी तसेच शहराचा विकास आराखडा मंजूर करण्यात यावा. माणगावमधील भादाव गावाला जोडणारा नवीन पूल व्हावा, शहरातील नाट्यगृहाच्या कामाला गती मिळावी असे विविध प्रश्न, समस्या त्यांनी मांडल्या.

या वेळी माजी नगराध्यक्ष आनंद यादव यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सांगितले की, लोकसभा निवडणुकीत आपल्याला शहरातून पाहिजे तसे मताधिक्य मिळाले नाही याची खंत आपल्या सर्वांच्या मनात आहे. याची भरपाई आपल्याला या विधानसभा निवडणुकीत काढायची असून आदिती ताईंना भरपूर मताधिक्य आपण सर्वानी द्यायचे आहे. या करिता महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी झोकून देऊन नियोजनबद्ध काम करा. आपली लाडकी बहीण म्हणून आदिती ताईंना भरपूर मताधिक्य देऊन भाऊबीजेची भेट द्या, असे ते म्हणाले.

तालुका प्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, आदींची ताईंना आपल्याला ७० ते ८० हजार मतांच्या फरकाने निवडून आणायचे आहे. भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना महायुतीच्या माध्यमातून येणाऱ्या सूचनांचे भारतीय जनता पक्ष पालन करून विकासाचे व्हिजन असलेल्या आदिती ताईंना मोठ्या मताधिक्यांनी निवडून आणू. जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना लाखाच्या फरकाने आदितीताई निवडून येतील, असे आपण सर्वांनी काम करू.

# चिचखांबला गावातील 'उबाठा' कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**चौक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत, आणि पक्षांतर होण्यास जोर वाढला आहे. खालापूर तालुक्यातील चिचखांबला येथील 'उबाठा'च्या असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्यावर नितांत निष्ठा ठेवणारे अनेक लोक या परीसरात आहेत. खालापूर तालुक्यातील पण उरण विधानसभा क्षेत्रातील चिचखांबला या गावांतील सर्व स्त्री पुरुष यांनी स्थानिक नेतृत्व सुधीर ठोंबरे यांच्यावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे या परीसरात भारतीय जनता पक्षाची ताकद वाढली आहे. आमचा आमदार, खासदार, मंत्री आमच्यासाठी सुधीर ठोंबरे आहे, त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. त्यामुळे आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याचे प्रवेश करणाऱ्या महिला व पुरुष यांनी सांगितले.

भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर दत्तात्रेय ठोंबरे, खालापुर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्या अध्यक्षतेखाली उरण मतदार संघातील चिचखांबला गावातील 'उबाठा' कार्यकर्ते संजय लहू वाघमारे, संजय वाघमारे, देवीदास मुकणे, सुनील मुकणे, राजन वाघमारे, अंकुश मुकणे, नितेश वाघमारे, बाबू वाघमारे, सचिन वाघमारे, कैलास वाघमारे, राजेश वाघमारे, काळूराम वाघमारे, दगडू वाघमारे, दत्तू वाघमारे, जनार्दन मुकणे, किसन पवार, अनिल वाघमारे, शाम वाघमारे, अशोक खोपकर, प्रकाश मुकणे, गणेश मुकणे, जमण मुकणे, दर्शना मुकणे, वनिता मुकणे, रेणूका मुकणे, धनश्री मुकणे, बेबी वाघमारे, जनी वाघमारे, वैशाली वाघमारे, कविता पवाक्षर, चंद्री वाघमारे, गोपी मुकणे, देवकी मुकणे, संगीता मुकणे, पुष्पा मुकणे, विमल मुकणे, लक्ष्मी वाघमारे, मंगल मुकणे, शकुण वाघमारे आदी असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



**कर्जत : दिवाळीनिमित्त लहानग्यांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त केला.** (छाया : विजय मांडे)

# माथेरानमध्ये पोलिसांचा रूटमार्च



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या दिवाळी पर्यटन हंगामास सुरुवात झाली असून येथील कायदा सुव्यवस्था मर्यादित रहावी आणि आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता माथेरान शहरात येथील पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पोलीस कर्मचारी व तालुक्यातील पोलिसांनी लाँग रूटमार्च काढून नागरिकांना सुरक्षेबाबत शुभ संदेश दिला.

दिवाळी हंगामापासून माथेरानच्या नवीन आर्थिक वर्षाला सुरुवात होत आहे. दिवाळी पर्यटन हंगाम येथील महत्त्वाचा पर्यटन हंगाम म्हणून ओळखला जातो. पर्यटनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असून माथेरान पर्यटनस्थळी देश विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने गुजरात येथील पर्यटक तसेच मुस्लिम धर्मीय पर्यटक जास्त प्रमाणात दिसून येत आहेत. माथेरान तसे गुन्हेगारीदृष्ट्या शांत असले तरीही येथे या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणात बाहेरून पर्यटक येत असतात त्यामुळेच कायदा सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता माथेरान पोलीस प्रशासन नेहमीच सज्ञ असते. येथील नागरिकांना तो संदेश पोहचविण्याकरता आज येथील विविध भागांमध्ये पोलिसांनी लाँग रूटमार्च काढून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

बाजारपेठेतून निघालेल्या या रूट मार्च कडे आलेले पर्यटक व स्थानिक नागरिक आश्चर्याने पाहत असताना पहावयास मिळाले.

**पावसाळा नुकताच संपल्यानंतर माथेरानचा दिवाळी पर्यटनास आता खऱ्या अर्थाने सुरुवात होत असून गुजरातमधील तसेच मुस्लिम पर्यटकांनी माथेरानकडे मोठ्या संख्येने ओढ दाखविली. हा पर्यटन हंगाम चांगला जाण्याची चिन्हे दिसत असून याचा फायदा निश्चितच हॉटेल व्यवसायाला होणार आहे.**

**-सुधीर जाधव, हॉटेल व्यवस्थापक, माथेरान**

# दिवाळी पाडवा उत्साहात साजरा



**चौक : प्रतिनिधी**

कार्तिक शुक्ल प्रतिपदेला दिवाळी पाडवा साजरा करण्यात आला. कार्तिक शुक्ल प्रतिपदेला बलिप्रतिपदा असे म्हणतात. या दिवशी पत्नी आपल्या पतीला ओवाळणी करतात.

दिवाळी पाडव्याच्या या सणाला पती-पत्नीच्या नात्याला विशेष महत्त्व असते. या दिवशी पत्नी आपल्या पतीला ओवाळते, त्याची आरती करते. याबाबत पुराण कथेत असे आहे की, भगवान विष्णूंनी बळी राजाचे गर्वहरण केले, शिवाय त्याच्या दातृत्त्वाचा मान ठेवून त्याचा लौकिक वाढवला, ते पाहून लक्ष्मी माता प्रसन्न झाली. तिने आपल्या पतीचे अर्थात भगवान विष्णूंचे औक्षण करून स्वागत केले, तेव्हा विष्णूंनी तिला ओवाळणी म्हणून ऐश्वर्य प्राप्तीचा आशीर्वाद दिला. विष्णु-लक्ष्मीच्या जोडीने एकमेकांचा जो आदर सन्मान केला तसा प्रत्येक पती पत्नीने एकमेकांचा करावा, या उद्देशाने पाडव्याला नवऱ्याला ओवाळण्याची आणि नवऱ्याने एखादी भेटवस्तू देण्याची प्रथा पडली आहे.



**चौक : बहिणींनी आपल्या भावांना ओवाळणी केल्यानंतर एकत्रित भाऊबीजेच्या आनंदाला जणू उधाण आले.**


**जाहिर नोटीस**

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे आवरे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री जोमा हरी गावंड व इतर यांच्या मालकीची आहे.

| मालकाचे नाव | मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. जोमा हरी गावंड<br>२. पार्वती गजानन गावंड<br>३. मनोहर गजानन गावंड<br>४. सविता प्रशांत म्हात्रे<br>५. रूपेश गजानन गावंड<br>६. स्वाती दर्शन तिलोरे | आवरे | १३९/६ | ०-०६-२०<br>पो.ख. ०-००-५०<br>**एकुण ०-०६-७०** | १.२५ |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**अ‍ॅडव्होकेट,**

**९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी उरण, ता. उरण. फोन नं. ८८७९१४१२३२**


# फटाकेमुक्त दिवाळी अभियानास प्रतिसाद

## 'अंनिस'चे पर्यावरणस्नेही पाऊल

**पाली : प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती फटाकेमुक्त दिवाळी अभियान राबवित आहे. यंदाही हे अभियान जिल्ह्यात राबविले जात आहे. यासाठी जनजागृती, पुस्तक स्टॉल, सेल्फी पॉईंट, पत्रके वाटप आदी उपक्रम राबविले जात आहेत. याबरोबरच पाली नगरपंचायत नेदेखील पर्यावरणस्नेही फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे. त्याबरोबर शाळा महाविद्यालयातूनदेखील फटाके मुक्त दिवाळीसाठी आवाहन करण्यात आले आहे.

महा अंनिसबरोबरच विविध सामाजिक संघटना, काही पर्यावरण प्रेमी लोक, समाजसेवक आणि जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयातून देखील पर्यावरणस्नेही दिवाळीसाठी प्रभावी जनजागृती केली जात आहे. फटाके वाजवून खरे तर विध्वंसक वृत्ती वाढू शकते तसेच वायू व ध्वनी प्रदुषणही वाढते. पर्यावरण ऱ्हास याबरोबरच सभोवतालच्या प्राण्यांनादेखील फटाक्यांचा त्रास होतो. त्यामुळे अनेक सुज्ञ पालक व शिक्षक आपल्या मुलांना दिवाळीत फटाके न फोडण्यास प्रोत्साहित करातांना दिसत आहेत. फटाक्यांचे दुष्परिणामांची माहिती देत आहेत.

फटाके फोडण्याऐवजी मुलांना किल्ले बांधणी, आकाश कंदिल व भेटकार्ड बणविणे, रांगोळी काढणे अशा रचनात्मक उपक्रमात सहभागी करुन घेत आहेत तसेच फटाक्याचे पैसे वाचवून त्या पैश्यांत अवांतर वाचनाची पुस्तके विकत घेण्यास मुलांना प्रोत्साहित केले जातांना दिसत आहे. केवळ सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनासाठी लाखो रुपयांचे उत्पन्न बंद करण्याचे धाडस फार कमी लोक करतात. हे धाडस करून दाखविले आहे पेण येथील रोहन मनोरे या तरुणाने. जवळपास सात ते आठ वर्ष मोठ्या जोमात सुरु असलेले फटाक्यांचे एका झटक्यात बंद करून फटाके विक्री शुन्यावर आणण्याचा केला संकल्प. आई वृंदा व वडील वसंत मनोरे यांनी त्यांच्या या समाजोपयोगी निर्णयाला मोलाची साथ देत होकार दिला. तेव्हापासून ते फटाके मुक्तीच्या चळवळीत कार्य करत आहेत.

जिल्ह्यात काही शाळकरी मुले फटाके न फोडता किंवा अगदी कमी फोडून वाचलेल्या पैशातुन विधायक कामे करतांना दिसत आहेत. काही मुले फटाके मुक्त दिवाळी साजरी करून वाचविलेल्या पैश्यातून चांगली पुस्तके, खेळणी, भेटवस्तू, मिठाई, गरिबांच्या घरी फराळ देणे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक मदत करणे. आदी गोष्टी करतांना दिसत आहेत.



### फटाके न फोडता विधायक कामे

***अंनिसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना फटाके मुक्त दिवाळी साजरी करून किमान १०० रुपये वाचवा आणि वाचविलेल्या पैश्यातून चांगली पुस्तके, खेळणी, भेटवस्तू, मिठाई, गरिबांच्या घरी फराळ देणे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक मदत करणे, सारख्या सामजिक कार्यांसाठी प्रोत्साहित करण्यात येते.***

### सोशल मिडियातून जनजागृती

***अंनिसतर्फे फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअपद्वारे फटक्याच्या दुष्परिणामांची माहिती प्रसारित करणे. यासारख्या अभिनव पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत सहज पोहचता येते.***

**रजिप शाळा सिद्धेश्वर मधील सर्व विद्यार्थ्यांनी फटाके न वाजविण्याची शपथ घेतली. हे विद्यार्थी फटक्याऐवजी गोष्टी पुस्तके खरेदी करणार आहेत. या दिवाळीत फटाके फोडणार नाही त्याऐवजी पुस्तके विकत घेऊन वाचू अशी शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

**-जनार्दन भिलारे, शिक्षक, राजिप शाळा सिद्धेश्वर**


# कोकण मराठी साहित्य परिषद

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

कोकण मराठी साहित्य परिषदेची ३१ वी वार्षिक सर्वसाधरण सभा रविवार, **दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता कवी केशवसुत स्मारक मालगुंड, ता. जि. रत्नागिरी** येथे कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय अध्यक्षा माननीय नमिता रमेश कीर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

तरी कृपया सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन व मंजुरी.
२. सन २०२३ - २४ पर्यंतच्या झालेल्या खर्चाची माहिती देणे व मंजुरी घेणे
३. सन २०२४ - २५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४. सन २०२४ - २५ साठी सनदी लेखापाल यांच्या नियुक्तीला मंजुरी घेणे.
५. प्रत्येक जिल्हाध्यक्षांनी आपल्या अंतर्गत शाखांमध्ये केलेल्या नविन सभासदांच्या नावाची यादी सभेपुढे सादर करणे.
६. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयावर चर्चा करणे.
७. आभार व समारोप

स्थळ- मालगुंड
दिनांक - ३०/१०/२०२४

**केंद्रिय कार्यवाह**
कोकण मराठी साहित्य परिषद

**विशेष सूचना -**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास, त्याच दिवशी त्याच ठिकाणी, अर्ध्या तासाने सभा भरविण्यात येईल, त्या सभेस गणपूर्तीची अट राहणार नाही.
२. ज्या सभासदांना काही सूचना अगर ठराव पाठवायचे असतील, त्यांनी १० नोव्हेंबर २०२४ पूर्वी मालगुंड येथील केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावेत ही नम्र विनंती.

# नवी मुंबई पर्यटनस्थळाच्या प्रतीक्षेत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईला आधुनिकतेचा दर्जा प्राप्त झालेला असला; तरी हे आधुनिक शहर पर्यटनाच्या बाबतीत काहीसे वंचितच राहिले आहे. विकासासाठी जागा शिल्लक असताना पालिकेला या शहरात एकही पर्यटनस्थळ उभारता आलेले नाही.

पारसिक हिल हे शहरात असले तरी नवी मुंबईत नागरिकांनी यावे तरी कशासाठी? असा प्रश्न या शहराबाबत पडतो. वंडर्स पार्क हे एकमेव पर्यटनाची स्थळ बनलेले आहे. याउलट पनवेल महापालिकेत खारघर येथे आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्स, यासह प्रेक्षणीय पांडव कडा, आंतरराष्ट्रीय फुटबॉल ग्राउंड असे अनेक स्थळे आहेतं याबाबत आधुनिक समजल्या नवी मुंबई पालिका हद्दीत मात्र एकही स्थळ पर्यटक थांबून पाहतील व त्यातून महसूल मिळेल असे उपलब्ध नाही. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ झाल्यावर विदेशी नागरिकांनी नवी मुंबईत थांबून पर्यटनाचा आस्वाद घ्यावा, असा



कोणताही प्रयत्न या शहरात आजतागायत झालेला नाही. त्यामुळे नवी मुंबई शहर हे विदेशी नागरिकांसाठी मुंबईत जाण्यासाठी दळणवळणाच्या मर्गापूरते उरणार आहे.

नवी मुंबई शहराला खाडी किनारा लाभलेला आहे. शहरात वंडर्स पार्क सोडले तर शहरात कोणतेही पर्यटनस्थळ नाही. शहरात गवळी देवसारखे पर्यटनस्थळ आहे, मात्र तिथे वन विभागाची हद्द आहे.

ऐतिहासिक बेलापूर किल्लादेखील टिकवता आलेला नाही. राहण्याजोग्या शहराच्या स्पर्धेत नवी मुंबई हे पर्यटनस्थळे नसल्याने अनेक शहरांच्या मागे पडत आहे. पर्यटनासाठी कायम मुंबईवर अवलंबून राहावे लागत आहे. यापुढे खारघर, उलवेवर अवलंबून राहावे लागणार आहे. ऐरोलीतील खाडी किनाऱ्याचा उपयोग वनविभागाने फ्लेमिंगो सफारीसाठी केला आहे, मात्र तो महसूल वन विभागाला मिळत आहे. मुंबईत असलेले तारांगण, मत्स्यालय, प्राणी संग्रहालय, ऐतिहासिक वास्तू संग्रहालय अशा कित्येक बाबतीत नवी मुंबई पालिकेला काहीही साध्य करता आलेले नाही.

कायम मुंबईशी तुलना करू पाहणाऱ्या नवी मुंबई महापालिकेने वेगाने स्वतःच्या पर्यटनस्थळे निर्माण करणे गरजेचे आहे. अन्यथा जागतिक प्रवाशांसाठी नवी मुंबई हे फक्त प्रवासाचे माध्यम उरण्याची शक्यता आहे.

**फ्लेमिंगो क्षेत्र वाचविण्याची गरज**

फ्लेमिंगो शिल्प उभारून फ्लेमिंगो सिटीची तयारी सुरू असताना खऱ्या खुऱ्या फ्लेमिंगो पाणथळ जागांचे अस्तित्व भूमाफियांनी धोक्यात आणले आहे. पालिकेनेही नैसर्गिक क्षेत्रे वाचवून स्वतःचे काहीअंशी उरलेले पर्यटन वाचवण्याची गरज आहे. त्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी पर्यावरणवादी लढत आहेत.

# उद्यानातील पाण्याच्या टाकीत पडून मुलाचा मृत्यू



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १५ येथील मनपाच्या उद्यानातील पाण्याच्या टाकीत पडून एका आठ वर्षीय मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. या प्रकरणी अद्याप कोणावर गुन्हा दाखल झाला नसून पोलीस दफ्तरी घटनेची नोंद करण्याचे काम सुरू आहे.

दिवाळीनिमित्त शाळांना सुट्टी असल्याने लहान मुलांनी उद्याने फुलून गेली होती. शनिवारी (दि.२) वाशी सेक्टर१४ येथील पालवे उद्यानातही चिमुकल्यांची गर्दी होती, मात्र रात्री नऊ साडे नऊच्या सुमारास या गर्दीतील एक आठ वर्षीय मुलगा अचानक दिसेनासा झाला. त्याचा खूप शोध घेतला, मात्र तो आढळून आला नाही. काही वेळाने शंका आल्याने उद्यानातील भूमिगत पाण्याच्या टाकीचे झाकण उघडे असल्याचे लक्षात आल्याने टाकीत पाहणी केली असता मुलगा आढळून आला. त्याला बाहेर काढून नजीकच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. तिथे त्याच्या पोटात गेलेले पाणी काढण्यात आले, मात्र तेथे अतिदक्षता विभाग नसल्याने त्याला मनपा रुग्णालयात हलविण्यात आले.

तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले, अशी माहिती स्थानिक प्रकाश मोरे यांनी दिली. माहितीला दुजोरा वाशी पोलिसांनी दिला आहे. या घटनेची नोंद अद्याप न झाल्याने नाव माहिती नाही, असेही वाशी पोलिसांनी सांगितले.

# वशेणी इतिहास संपादकीय मंडळातर्फे ‘दिवाळी पहाट’

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळ प्रस्तुत दिवाळी पहाट २०२४ हा कार्यक्रम नुकताच उरण तालुक्यातील वशेणी गावात झाला.

दिवाळी पहाट या कार्यक्रमात उरण, पेण, पनवेल आणि ठाणे परिसरातील गौरी कोरगावकर, हर्षाली म्हात्रे, सानिका पाटील, रमेश थवई, संदीप गावंड, रमणिक म्हात्रे, रमण पंडित, शिवपार्वती भजन मंडळ, भक्ती ठाकूर, रविंद्र खोत, गणेश खोत, गौरीश पाटील, किशोर पाटील, अक्षता गोसावी, अनिल भोईर आणि बासरी बादक प्रकाश बागडे या कलाकारांनी दीपावली आणि भारतीय संस्कृती जतन करणारी सुरेल गीते सादर करून रसिक वर्गाला मंत्रमुग्ध केले.



दिवाळी पहाट कार्यक्रमाचे औचित्य साधून छोट्या पडद्यावर आणि चित्रपट सृष्टीत नावा रूपाला येऊ पहाणारी वशेणी गावची भूमीकन्या अभिनेत्री प्रज्ञा प्रमोद म्हात्रे हीचा सन्मान करण्यात आला. या वेळी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्यकारिणी सदस्य एल बी पाटील यांनी वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कौतुक केले. सादर केलेली गीते आणि या गीतांना जोडलेल्या निवेदनाने गावपण जागे झाल्याचे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमास शर्मिला महेंद्र गावंड, ह.भ.प.अनिल महाराज, निळकंठ महाराज, नंदकुमार महाराज, सेवा निवृत्त प्राचार्य गणपत ठाकूर, सदाशिव पाटील, संजय होळकर, संजीव पाटील, माजी सरपंच जीवन गावंड, प्रसाद पाटील, शाम ठाकूर, कृष्णा ठाकूर, रेवती गावंड, ग्रामपंचायत सदस्य गणेश म्हात्रे, जयंता पाटील, संग्राम पाटील, प्रितम म्हात्रे आदी उपस्थित होते.

# दिवाळे गावात बहिरीनाथाच्या उत्सवाला प्रारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील , मासळीसाठी प्रसिद्ध असलेल्या दिवाळे गावात दिवाळीच्या निमित्ताने होणारा बहिरीनाथाच्या उत्सवाला सुरुवात झाली आहे. गुरुवारी देवाची स्थापना करण्यात आली असून, गुरुवार पासून देवाचा पालखी सोहळा असणार असून, शनिवारी (दि.२) देवांना निरोप देऊन त्यांच्या जागी समुद्रात नेले जाईल.

बहिरीनाथ देव आणि त्याचा गावात साजरा होणारा उत्सव ही बेलापूरच्या कुशीत असणाऱ्या दिवाळे गावाची ऐतिहासिक ओळख आहे. या बहिरीनाथाच्या उत्सवाला गुरुवारपासून प्रारंभ झाला आहे. सकाळी अभिषेक करून देवाची स्थापना करण्यात आली आहे. स्थानिक आमदार मंदा म्हात्रे, भाजप युवा नेते सुधीर पाटील यांनी दिवाळे गावात येऊन देवाचे मनोभावे दर्शन घेतले. शुक्रवारी पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.



देवाची मूर्ती वर्षभर समुद्रात असते. समुद्रात जाऊन ग्रामस्थ ही मूर्ती वाजत गाजत गावात घेऊन येतात. या वेळी देवाला गावात आणण्यासाठी अनेक होड्या समुद्रात जातात. समुद्रात पाण्यात राहणारा आपला लाडका देव घरी येत असल्याने, गावात उत्साहाचे वातावरण पसरले आहे. एकीकडे दिवाळी सणाची धामधूम; तर दुसरीकडे बहिरीनाथ देवाचा तीन दिवस चालणारा उत्सव आहे. या उत्सवात देवाच्या दर्शनाला नवी मुंबई, मुंबई, पनवेल, ठाणे येथून हजारो भाविका मोठ्या संख्येने गर्दी करत असतात. ही २५० वर्षांहून जुनी प्रथा असल्याचे ग्रामस्थ हेमंत कोळी यांनी सांगितले.

रात्री भजन-कीर्तनात, पारंपरिक कोळीगीतांनी देवाची आळवणी करण्यात येते. शुक्रवारी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी देवाला सकाळी अभिषेक घालून त्यानंतर पालखीत बसवून मोठ्या धामधुमीत ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली. या वेळी गावातील भाविकानी देवाला दिवाळीचा फराळ, मिठाई, नारळ, हार, फुले अर्पण केला.

> **दिवाळे गावासाठी खरी दिवाळी ही तीन दिवसांचीच असते. देवाच्या आगमनापासून सुरू होते आणि देवाच्या विसर्जनानंतर दिवाळी समाप्त होते अशी गावकरांची भावना आहे. तर अभंगस्नानाच्या दिवसापासून सलग तीन दिवस फटाकड्याची मोठ्या प्रमाणात आतषबाजी करण्यात येते. आणि देवाचा आगमन सोहळा स्थापना उत्सव साजरा केला जातो.**
>
> **-रूपेश कोळी, ग्रामस्थ दिवाळे गांव**

दोन दिवस पाहुणचार घेतल्यावर शनिवारी देव पुन्हा आपल्या घरी समुद्रात जायला निघणार आहेत. दुपारी १च्या सुमारास देवाला पालखीत बसवून, वाजत-गाजत बंदरातील होडीत बसवून गावकरी व भाविक भक्तिभावाने बहिरीनाथाला निरोप देतात. आणि समुद्रात घरी सोडून येतात.

# वाशीतील पहिला पादचारी पूल खुला; नागरिकांना दिलासा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी-कोपरखैरणे या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाशीतील वाहतूक कोंडी लक्षात घेता, या ठिकाणी सेक्टर नऊ परिसरात पादचारी पूल उभारण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. या पुलाचे काम पूर्ण झाल्याने आता हा पादचारी पूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे जीव मुठीत धरून इथला रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना आता मोठा दिलासा मिळाला आहे.



या मार्गावर एकही पादचारी पूल नसल्याने, पादचाऱ्यांकडून ठिकठिकाणी रस्ता ओलांडण्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. ही वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या वतीने वाशीत हा पहिला पादचारी पूल बांधण्यात आला आहे.

वाशी हा खरेदीसाठी नवी मुंबईतील सर्वांत मोठे डेस्टिनेशन आहे. त्यामुळे सणासुदीच्या दिवशी तर इथे मोठ्या प्रमाणात फेरीवाले रस्त्यावर बसतात, त्यामुळे विक्रेते आणि खरेदीदार, यामुळे इथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. वाशी कोपरखैरणे रस्त्यावर, दोन्हींदिशेला दुकाने असल्याने इथे वाहन पार्किंगचाही गोंधळ असतो. खरेदी साठी येणाऱ्यांच्या गाड्या रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या असतात. शिवाय येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे लोकांना रस्ता ओलांडणे कठीण होते. त्यामुळे इथे पादचारी पूल उभारावा अशी नागरिकांची, पादचाऱ्यांची मागणी होती.

त्यानुसार वाशीतील पहिला पादचारी पूल वर्षभरापूर्वी वाशी सेक्टर ९ येथे बांधन्याचे सुरू करण्यात आले. दोन कोटी ४४ लाख रुपये खर्चाचे हे काम असून पुलाची लांबी २७ मीटर व रुंदी तीन मीटर इतकी आहे. या ठिकाणी दोन लिफ्टदेखील बसवण्यात येणार आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले यांना पूल चढ-उतार करण्यास सहाय्य होणार असल्याचे स्थानिक रहिवाशी विकास सोरटे यांनी सांगितले, मात्र सध्या पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी अडचण नको आणि रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांमुळे वाहतूक कोंडी ही नको म्हणून, नागरिकांसाठी हा पूल सुरू करण्यात आला आहे.





**खारघर : प्रभाग ४मध्ये महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचाराचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# निवडणुकीसाठी प्रभाग १७मध्ये भाजपची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा निवडणुकीसाठी भाजप पनवेल प्रभाग क्रमांक १७ मधील लोकमान्यनगर विभागाची आढावा बैठक झाली.

या वेळी विजय म्हात्रे, प्रभाग क्रमांक १७ अध्यक्ष रावसाहेब खरात, सेक्टर प्रमुख अक्षय मिसाळ, सेक्टर प्रमुख महेश पाटील, शिवानी घरत, बिल्डिंग प्रमुख जयंत सुनके आदी उपस्थित होते. लोकमान्य नगर इच्छापूर्ती गणेश मंदिराच्या बाजूला सेक्टर प्रमुख महेश पाटील यांच्या घरी बैठक झाली.



# अनाथाश्रमातील मुलांसोबत दुर्गा फाउंडेशनची दीपावली



**नवी मुंबई : बातमीदार**

दुर्गा फाउंडेशनच्या वतीने फणसवाडी विद्यार्थी, महिला व जीवन ज्योती अनाथाश्रमातील मुलांबरोबर दीपावली साजरी करण्यात आली. त्या वेळी या मुलांना फराळ, फटाके, दिवे, रंग, उटणे इत्यादी वाटप करण्यात आले.

या मुलांना फटाके मिळाल्याने मुलानी आनंद साजरा केला. अनेकांनी लगेचच फटाके उडवण्यास सुरुवात केली. आश्रमातील मुलींनी रांगोळी मिळाल्याने आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमावेळी दुर्गा फाउंडेशनच्या संस्थापिका शोभा भोईर, खारघर अध्यक्ष रसिका म्हात्रे, सीवूड्स अध्यक्ष भूषण तांडेल आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सहकार्य करणाऱ्या सिडको एम्प्लोयी युनियन तसेच सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले.

# झेंडू, शेवंती, गुलाब फुलांना मागणी वाढली

**नवी मुंबई : बातमीदार**

लक्ष्मीपूजनाच्या पार्श्वभूमीवर, घरोघरी पूजेसह सजावटीत वापरल्या जाणाऱ्या झेंडू, शेवंती, गुलाब व अन्य फुलांची मागणी लक्षणीय वाढल्याने त्यांचे दरही चांगलेच वधारले आहेत. दसरा सणावेळी २०० ते २५० रुपयांना मिळणारी झेंडू फुलांची जाळी दिवाळीत गुरुवारी सकाळी ५०० ते ६०० रुपयांपर्यंत पोहोचली होती, परंतु सायंकाळी आवक वाढल्यानंतर हेच भाव ३०० ते ४०० रुपयांपर्यंत खाली आले होते.



परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्याची झळ झेंडू फुलांच्या शेतीला बसल्याने नियमित उत्पादनात ३० ते ४० टक्के घट झाल्याची परिणती दर गगनाला भिडले आहेत. गोदाकाठावर भरणारा फूल बाजार लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला अर्थात गुरुवारी पिवळ्या व भगव्या रंगाच्या झेंडू फुलांनी बहरला. शहरातील विविध ठिकाणी फुलांची दुकाने लावली आहेत. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूजेबरोबर हार बनविण्यासाठी या फुलांना विशेष मागणी असते. घर, दुकान सजावटीत त्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. दीपावलीत मात्र ही फुले महागली आहेत. दसरा सणावेळी २०० ते २५० रुपये जाळी या दराने ही फुले मिळत होती. गुरुवारी सकाळी त्यांचे भाव दुपटीने वाढून ५०० ते ६०० रुपयांपर्यंत गेले होते.

दीपोत्सवात झेंडू, विविध रंगातील शेवंती, गुलाब, पाण्यातील कमळ आदी फुलांना मागणी आहे. सध्या शेवंती २५० ते ३०० रुपये किलो, गुलाबांचा १० फुलांचा गुच्छ ८० ते १२० रुपये, पाण्यातील कमळ प्रत्येकी २० ते ५० रुपयापर्यंत मिळत आहे. झेंडू फुलांच्या दरवाढीमुळे या फुलांचे तयार हारही महागले आहेत.

नवी मुंबई शहरात झेंडूच्या फुलांची विक्रीत वाट्टेल त्या दरात केली जात आहे. १०० रुपयांचा मोठा हार तब्बल ३०० रुपयांना विकला जात आहे. तर लहान २० रुपयांची फुलांची पुडी ५० रुपयांना विकली जात होती. अनेक नागरीक विक्रेत्यांची हुज्जत घालताना दिसले. नेहमीचे गिऱ्हाईक असेल तरी हार विक्रेते आमचे कमाईचे दिवस असल्याचे सांगत खुशाल रेट वाढवून विकत होते. श्रीफळाच्या किमतीतदेखील वाढ झालेली दिसून आली. तब्बल ३० ते ४० रुपयांना लहान नारळ विकले जात होते, मात्र नागरिकांवर मात्र नाईलाजाने विक्रेते विकतील त्या दरात खरेदी करण्याची नामुष्की ओढवली.

# गावोगावी रंगू लागल्या निवडणुकीच्या चर्चा

## उमेदवार, युती-आघाड्या, मतदानाबद्दल गप्पाष्टके

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

थंडीचे दिवस असतानासुद्धा वातावरणामध्ये उष्णता वाढ झाली आहे. अशात गाव, वाडी-वस्ती, तांड्यावर राजकारण तापू लागले आहे. निमित्त आहे विधानसभेची निवडणुकीचे. कोणाला कोणत्या पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळाली, कोणाचे तिकीट नाकारले, कोण अपक्ष, मतांची गोळाबेरीज, शक्तिप्रदर्शन आदी विषयांवर चर्चा रंगू लागल्या आहेत.

विधानसभेच्या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र आता दाखल झाले आहेत. छाननी व नामनिर्देशनपत्र पाठीमागे घेण्याबाबतच्या आता जिकडे-तिकडे चर्चा रंगत आहेत. प्रत्येक गावातील मंदिर, गल्लीबोळात, हॉटेल, रस्त्यांवर, कार्यक्रमात, शेतवस्तीवर मतदारसंघातून कोणत्या पक्षाने कोणता उमेदवार दिला, कोणाचे तिकीट कापले, कोण कार्यकर्ता, नेत्याने तिकीट मिळविण्यासाठी कोणत्या पक्षात उडी मारत उमेदवारी मिळविली, कोणाची ताकद किती याचा अंदाज बांधणीचे काम या चर्चेतून मतदार करताना दिसून येत आहेत.

गावागावांत अनेक पक्षातील कार्यकर्ते, पुढारी, मतदार आपल्याच पक्षातील उमेदवाराची सरशी होणार, जिंकणार. आमचाच उमेदवार अशी भूमिका मांडताना दिसत आहेत. अनेक जण जोशात येऊन आपलाच उमेदवार जिंकणार म्हणत पैजा लावत आहेत. कोण जिंकणार, कोण हरणार हे निकालानंतरच कळणार, मात्र तोपर्यंत चर्च रंगू लागल्या आहेत.



### अर्ज माघारीनंतर चित्र होणार स्पष्ट

विधानसभा निवडणुकीसाठी अधिसूचना निघाल्यावर अर्ज दाखल करण्यास उमेदवारांनी सुरुवात केली होती. २९ ऑक्टोबरपर्यंत दाखल अर्जांची छाननी दुसऱ्या दिवशी करण्यात आली. यामध्ये अवैध अर्ज बाद झाले. आता उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ नोव्हेंबर आहे. त्यानंतर लढतींचे चित्र स्पष्ट होऊन प्रचाराला वेग येईल. शेवटी २० नोव्हेंबरला मतदान होऊन २३ तारखेला निकाल आहे.

# महाड मतदारसंघातील कामकाजाचा निवडणूक निरीक्षकांकडून आढावा

## अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

निवडणूक निरीक्षक सतीश कुमार एस यांनी घेतला महाड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कामकाजाचा शनिवारी (दि. २) आढावा घेतला. स्ट्राँग रूम आणि मतमोजणी केंद्राची पाहणी करून भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी या वेळी दिले.

सतिश कुमार यांनी निवडणुकीचे नोंदणी कार्यालय, स्ट्राँग रूम, एमसीसी, कंट्रोल रूम, साहित्य विभाग, सीसीटीव्ही, आचारसंहिता कक्ष, कंट्रोल रूमची पाहणी केली. आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशही त्यांनी दिले.

निवडणूक आयोगाच्या निर्देशांप्रमाणे स्ट्राँग रूमच्या सुरक्षेतेबाबत पोलीस पथकास सूचना दिल्या तसेच मतमोजणी केंद्रास भेट देऊन आवश्यकतेनुसार सर्व बाबींची पूर्तता करण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.

सर्व यंत्रणांनी सतर्क राहून काम करणे गरजेचे आहे. विशेषतः विविध पथकांनी अत्यंत बारकाईने अधिक दक्षतापूर्वक कामकाज करावे, असेही त्यांनी सांगितले.

निवडणूक अनुषंगाने त्यांनी विविध कक्षास भेट देऊन पाहणी केली. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, नायब तहसीलदार भाबड आणि विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



# इंदापूर, माणगावमध्ये विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती



**माणगाव : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी शासनाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील इंदापूर एस.एस. निकम इंग्लिश स्कूलतर्फे मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली.

एस.एस. निकम इंग्लिश स्कूलतर्फे शाळेच्या परिसरात इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली होती. घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगून या विषयी जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्ये तयार केली होती. रॅलीच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या रॅलीत शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव, पूर्व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका संचिता जाधव तसेच शाळेतील सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीवर्गाने सहभाग घेतला.

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वीप कार्यक्रमांतर्गत माणगाव येथील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली.

राज्यात विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झालेली असून त्याकरिता २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर शंभर टक्के मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोग पुरस्कृत स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून या कार्यक्रमांतर्गत माणगाव येथील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली.





या स्वीप कार्यक्रमांतर्गत आदर्श प्राथमिक विद्यामंदिरमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः माणगावातून रॅली काढून मतदान जनजागृतीपर घोषणा देण्यात आल्या. या शाळेमध्ये शाळास्तरावर मतदान जनजागृतीपर चित्रकला स्पर्धा, रंगभरण स्पर्धा व रांगोळी स्पर्धा तसेच प्रबोधनपर निबंध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे स्वीप कार्यक्रमात आदर्श प्राथमिक विद्यामंदिर शाळेने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# कुटूंब रंगलंय काव्यात कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद माणगाव व नागरिक सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने प्रा. विसुभाऊ बापट यांचा कुटूंब रंगलंय काव्यात हा कार्यक्रम शनिवारी (दि. २) सकाळी ६ ते ९.३० या वेळेत कुणबी भवनात उत्साहात झाला.



साहित्यविषयक कविता-गाणी, कथा, साहित्यावर आधारित विविध प्रकारांच्या या दिवाळी पहाट कार्यक्रमास प्रेक्षकांनी भरभरून आनंद घेतला. या कार्यक्रमास 'कोमसाप' रायगडचे अध्यक्ष सुधीर शेट, समन्वयक अ.वि. जंगम, नागरिक सेवा फाउंडेशनचे सचिव भालचंद्र खाडे, तळा अध्यक्ष हेमंत बारटक्के, महाड अध्यक्ष गंगाधर साळवी, प्रा. प्रणय इंगळे, उद्योजक नंदकुमार राजपूरकर यांच्यासह साहित्यिकांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात तबला साथ धीरज बडे यांनी दिली. सूत्रसंचालन रामजी कदम यांनी केले. अत्यंत उत्साहात रसिक प्रेक्षकांनी कुटूंब रंगलंय काव्यात कार्यक्रमातून विविध काव्यरूपांचा अनुभव घेतला.

माणगाव शाखा सचिव अपूर्वा जंगम यांना गुणवंत शिक्षिका म्हणून मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाड शाखेच्या वतीनेही त्यांचा सन्मान करण्यात आला.

शाखेचे अध्यक्ष अजित शेडगे, सचिव अपूर्वा जंगम, इतिहासकार रामजी कदम, जिल्हा प्रतिनिधी रुपेश शेट, भालचंद्र खाडे, ज्योती बुटाला यांनी कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून मेहनत घेतली.

## मतदान जनजागृतीपर विविध उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील अशोकदादा साबळे विद्यालयातर्फे मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत साबळे विद्यालयातर्फे रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य, विद्यार्थी रॅली तसेच बाईक रॅली काढण्यात आली. क्रीडा शिक्षक वाढवळ, व डॉ. रावळे यांच्या उपस्थितीत बाईक रॅली काढण्यात आली.

या वेळी समस्त माणगावकरांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. मतदान जनजागृतीच्या या विविध कार्यक्रमांत मुख्याध्यापक डी.एम. जाधव, उपमुख्याध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य जमधाडे, पर्यवेक्षक सोनावणे, शिक्षक प्रतिनिधी पाटील तसेच शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# माथेरान पालिकेच्या कर्मचारीवर्गाला बोनस

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस मिळाला नसल्याने कर्मचारीवर्गाने काम बंद आंदोलन करीत ते नगरपालिका प्रांगणात ठिय्या मारून बसले होते. पालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांनी यामध्ये मध्यस्थी करून सर्व कर्मचाऱ्यांना ठेकेदारांमार्फत बोनस मिळवून दिला. त्यामुळे कंत्राटी कर्मचारीवर्गाची दिवाळी गोड झाली आहे.

माथेरानमधील स्वच्छता विभाग, बांधकाम विभाग आणि माळी कामगार अशा कंत्राटी कामगारवर्गाला त्यांच्या ठेकेदारामार्फत दिवाळी बोनस देण्यात आला नव्हता. बोनस मिळाला नसल्याने कामगारांनी काम बंद आंदोलन केले होते. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सर्व कामगार पालिका आवारात मागील दोन दिवस ठिय्या मारून बसले होते. पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांनी यामध्ये मध्यस्थी करून या कामगारांना बोनस मिळून दिला. त्यामुळे सर्व कामगारांनी कामावर रुजू होत पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांचे आभार मानले. या वेळी मुख्याधिकाऱ्यांनी कामगारांना मिठाईचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड केली.



# बच्चेकंपनीसह मोठ्यांनाही मातीच्या किल्ल्यांची भुरळ



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

दिवाळी म्हणजे मौज, मजा आणि आनंदाचा सण. डिजिटल व रेडिमेडच्या युगातदेखील बच्चेकंपनीसह मोठी मंडळी किल्ले बनविण्यास पसंती देतात. बहुसंख्य गावांमध्ये अजूनही मुले व तरुण किल्ले बनवण्याच्या विधायक उपक्रमात स्वतःला गुंतवताना दिसून येतात. मातीचे मावळे, प्राणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत तसेच रेडिमेड किल्लेसुद्धा विक्रीला आले आहेत.

पालीतील श्री स्वामी समर्थ नगर येथील हरिओम वास्तू बिल्डिंग येथे सर्व रहिवाशांनी मिळून सरसगड किल्ल्याची हुबेहू प्रतिकृती तयार केली आहे. पालीतील खडक आळी येथे किल्ले पद्मदुर्ग साकारण्यात आला आहे. हा किल्ला हुबेहूब वाटत आहे. येथील पंकज बेलोसे, राज जाधव, पिंट्या बेलोसे, मंथन बेलोसे, प्रज्ञा बेलोसे यांनी ही प्रतिकृती साकारली आहे, तर कुंभारवाड्यात पारगड किल्ल्याची सुरेख प्रतिकृती बनवण्यात आली आहे.

मागील वर्षीच्या तुलनेत मूर्तींच्या किमती यंदा १० ते २० टक्क्यांनी वधारल्या आहेत. पालीतील कारागिर ज्योती कुंभार यांनी सांगितले की, विक्री चांगल्या प्रकारे होत आहे. त्यामुळे समाधान आहे. पालीतील स्पंदन शिंदे याने सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, विविध प्राणी यांच्या मूर्ती किल्ल्यावर ठेवलेल्या बघायला खूप आवडते.

डोंगर, माळरान व शेतातून लाल किंवा काळी माती घमेल्यात किंवा पोत्यामध्ये टाकून आणायची आणि सर्व मित्र मंडळी मिळून किल्ला बनविण्याची मज्जा काही औरच असते. हा आनंद गाव व खेड्यातील, तर काही प्रमाणात शहरातील मुले घेताना दिसले. किल्ल्याला मावळे, सैनिक, प्राणी व रंग यांनी सजवायचे. त्यावर पाण्याचे कारंजे लावायचे तसेच मोहरी टाकून गवत उगवायचे आणि रात्री किल्ल्यावर रोषणाई करायची असा विधायक उपक्रम दिवाळीत अनेक गावातील मुलांनी केला. बच्चेकंपनीसह मोठेदेखील यामध्ये सहभागी होताना दिसत आहेत.

किल्ल्यावर ठेवण्यासाठी प्लास्टिकपेक्षा मातीच्या मूर्तींना मागणी आहे. बाजारात छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या विविध आकाराच्या, मुद्रांच्या व रंगांच्या मूर्ती उपलब्ध आहेत. याबरोबरच मातीच्या ढाल, तोफा आदी युद्ध साहित्यदेखील आहेत. शिवाय विविध देवी-देवता, प्राणीसुद्धा मिळत आहेत. मध्यम आकाराची शिवरायांची मातीची मूर्ती ८० ते १५० रुपयांना आहे, तर मातीचे मावळे, प्राणी २० ते ३० रुपयांपासून पुढे उपलब्ध आहेत. ठिकठिकाणी यामध्ये थोडाफार फरक आहे.

सध्या रेडिमेड किल्ल्यांनादेखील मागणी आहे. शहरात, इमारती, वसाहती आदी ठिकाणी हे रेडीमेड किल्ले लावले जातात आणि त्यावर मावळे व छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती विराजमान केली जाते.

**छत्रपती शिवाजी महाराज, मावळे व इतर मूर्तींना मागणी आहे. विक्रीसुद्धा वाढली आहे. अनेकजण चांगला प्रतिसाद देत आहेत. शिवाय या मूर्ती मातीच्या असल्यामुळे पर्यावरणपूरक आहेत.**

**-नारायण बिरवाडकर, मूर्ती विक्रेत्या**

**दिवाळीत दरवर्षी आवर्जून किल्ला बनवतो. या वर्षी बिल्डिंगमधील सर्वांनी किल्ला बनवला आहे. मातीचा किल्ला बनवायला खूप आवडते. किल्ला व त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती, मातीचे मावळे विराजमान झालेले पहायला अभिमान वाटतो. किल्ला बनविताना खूप मज्जा येते.**

**-श्रेया शेळके, पाली**

# टीम इंडियाचा सलग तिसरा लाजिरवाणा पराभव

## प्रमुख खेळाडूंची हाराकिरी; न्यूझीलंडकडून कसोटी मालिकेत व्हाइटवॉश

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडने सलग तिसऱ्या सामन्यातही टीम इंडियाचा दारुण पराभव करत कसोटी मालिकेत पहिल्यांदाच व्हाइटवॉश दिला आहे. मुंबई कसोटी सामन्यात न्यूझीलंडने भारताचा २५ धावांनी पराभव करत तीन सामन्यांची मालिका ३-ने खिशात घातली.

या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने पहिल्या डावात २३५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव २६३ धावांवर संपला, ज्यामुळे भारताकडे २८ धावांची आघाडी होती. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा दुसरा डाव १७४ धावांवर संपला आणि त्यांनी एकूण १४६ धावांची आघाडी घेतली. त्यानंतर भारतासमोर १४७ धावांचे लक्ष्य होते, मात्र भारतीय संघ १२१ धावांवरच मर्यादित राहिला. भारताकडून ऋषभ पंतने दुसऱ्या डावात सर्वाधिक ६४ धावा केल्या, तर न्यूझीलंडकडून एजाज पटेलने सर्वाधिक सहा विकेट्स घेतल्या.

मायदेशात झालेल्या दोन किंवा अधिक सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताला दुसऱ्यांदा क्लीन स्वीप मिळाला आहे. यापूर्वी फेब्रुवारी २०००मध्ये दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांच्या मालिकेत भारताचा २-० असा पराभव केला होता. त्याचबरोबर घरच्या मैदानावर तीन किंवा त्याहून अधिक सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताला प्रथमच क्लीन स्वीप मिळाला आहे.




### एजाज पटेलने मोडला बोथमचा विक्रम

भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडचा स्टार फिरकी गोलंदाज एजाज पटेलने अप्रतिम कामगिरी केली. पहिल्या डावात भारतीय वंशाच्या एजाजने २१.४ षटकात १०३ धावा देत पाच विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर सामन्याच्या दुसऱ्या डावात चार विकेट घेताच त्याने इयान बोथमचा खास विक्रम मोडीत काढला. भारतातील कोणत्याही एका ठिकाणी सर्वाधिक कसोटी विकेट्स घेणाऱ्या विदेशी गोलंदाजांच्या यादीत एजाज पहिला क्रमांकावर पोहचला आहे. यासह त्याने इयान बोथमचा विक्रम मोडला आहे. बोथमने वानखेडे स्टेडियमवर २२ कसोटी विकेट घेतल्या होत्या.

न्यूझीलंड संघाने या मालिका विजयासह इतिहास घडवला आहे. त्यांनी भारतात पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकली इतकेच नाही, तर टीम इंडियाला क्लीन स्वीपही दिला. न्यूझीलंडने १२ वर्षांनंतर भारताला घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावण्यास भाग पाडले आणि घरच्या मैदानावर सलग १८ मालिका विजयांची मालिकाही खंडित केली. विशेष बाब म्हणजे न्यूझीलंडने ही कसोटी मालिका केन विल्यमसनशिवाय खेळली आहे तसेच टॉम लॅथम प्रथमच संघाचे नेतृत्व करत होता. असे असतानाही 'किवी' संघाने कामगिरीत कोणतीही कसर सोडली नाही.

या मालिकेत टीम इंडियाची कामगिरी खूपच खराब राहिली. भारतीय संघ मायदेशात नाही तर परदेशात खेळतोय असे वाटत होते.

# कुस्ती स्पर्धेत वाडगाव आखाडा प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील कुस्ती स्पर्धेत खुल्या गटामध्ये वाडगाव आखाडा प्रथम क्रमांकाचा विजेता ठरला. आंदोशी आखाडा व्दितीय व बेलोशी आखाडा तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

सालाबादप्रमाणे लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने ६९वी पारंपरिक कुस्ती स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी मंडळ, रेवदंडा-चौल यांच्या वतीने रेवदंडा हायस्कूलच्या पटांगणात रंगली.

या वेळी श्री छत्रपती शिवाजी मंडळ रेवदंडा-चौलचे अध्यक्ष सुरेश खोत, चिटणीस हेमंत गणपत, खजिनदार शरद वरसोलकर, सदाशिव मोरे, तसेच रायगड जिल्हा कुस्ती संघटना तथा अलिबाग तालुका कुस्ती संघटना अध्यक्ष जयेद्र भगत यांची उपस्थिती होती. त्याचप्रमाणे भालचंद्र गुरव, अजित पाटील, चंद्रकांत धाटावकर, बाळू नवखारकर, महेश ठाकूर, जयंत शिंदे आदी उपस्थित होते.

या कुस्ती स्पर्धेत वाडगाव, आंदोशी, बेलोशी, वळवली, यशवंतखार असे आखाडे सहभागी झाले होते. यामध्ये एकूण ४५ कुस्त्या खुल्या गटात, तर १५ कुस्त्या प्रेक्षणीय खेळविण्यात आल्या.

स्पर्धेत पंचाचे काम राष्ट्रीय पंच रवींद्र घासे, वैभव मुकादम, सुधाकर पाटील, वासुदेव पाटील, मिलिंद भगत, संदीप मोरे यांनी पाहिले, तर टाईम किपरचे काम भालचंद्र गुरव यांनी उत्कृष्टरित्या सांभाळले.

बक्षीस वितरण कुस्ती संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत व मंडळाचे रेवदंडा-चौल अध्यक्ष सुरेश खोत, चिटणीस हेमंत गणपत यांच्या हस्ते झाले. प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक विजेत्या आखाड्यांना चषक प्रदान करण्यात आले.



## बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी भारताचा नेट सरावावर भर

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी मालिकेपूर्वी 'अ' संघाविरुद्धचा तीनदिवसीय सामना रद्द करण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. खेळाडू अधिक वेळ नेट सरावास देण्यास इच्छुक असल्याने संघ व्यवस्थापनाने असे ठरवले.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून पर्थ येथे सुरुवात होणार आहे. भारतीय संघ १५ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत पर्थमध्येच ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारत 'अ' संघाविरुद्ध सराव सामना खेळणार होता. भारत 'अ' संघ सध्या ऑस्ट्रेलियातच असून यजमान देशाच्या 'अ' संघाविरुद्ध कसोटी मालिका खेळत आहे.

# डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारताला धक्का!

## 'किवीं'विरुद्धच्या पराभवानंतर पहिले स्थान गमावले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताला घरच्या मैदानावर इतिहासातील मोठा लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला आहे. न्यूझीलंड संघाने कसोटी मालिकेतील तिन्ही सामने जिंकत क्लीन स्वीप केले. या ऐतिहासिक विजयानंतर भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या गुणतालिकेत मोठा धक्का बसला आहे, तर न्यूझीलंडला याचा फायदा झाला आहे.

भारतीय संघाला या मानहानिकारक पराभवासह डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पहिले स्थान गमवावे लागले आहे. भारतीय संघ सलग तीन कसोटी पराभवांनंतर आता दुसऱ्या स्थानी आला आहे. भारताची गुणतालिकेतील टक्केवारी ५८.३३ टक्क्यांवर गेली आहे, तर ऑस्ट्रेलियाचा संघ



६२.५० टक्क्यांसह पहिल्या स्थानी कायम आहे.

या कसोटी चॅम्पियनशिप सायकलमध्ये भारताने एकूण १४ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये संघाने आठ सामने जिंकले, पाच गमावले आणि एक सामना अनिर्णित राहिला. कसोटी मालिकेत भारताचा ३-० असा पराभव केल्यानंतर न्यूझीलंड संघ आता गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. किवी संघाने ११पैकी सहा सामने जिंकले असून पाच सामने गमावले असून या संघाची विजयाची टक्केवारी ५४.५५ आहे. श्रीलंकेचा संघ ५५.५६च्या विजयाच्या टक्केवारीसह तिसऱ्या स्थानावर आहे.

सध्या दक्षिण आफ्रिका ५४.१७ टक्केवारीसह पाचव्या स्थानावर आहे, तर इंग्लंड ४०.७९च्या टक्केवारीसह सहाव्या स्थानावर आहे. याशिवाय पाकिस्तान ३३.३३च्या विजयाच्या टक्केवारीसह सातव्या स्थानावर आहे.














**पनवेल : दिवाळीनिमित्ताने ज्येष्ठांचा आशीर्वाद घेण्याची परंपरा आहे. म्हणूनच भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव तसेच राम पाटील, सुधीर ठाकूर, ज्योत्स्ना ठाकूर, शिवाजी दुर्गे यांनी शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले व त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**











**पनवेल : दिव्यांचा आणि प्रकाशाचा सण असलेली दिवाळी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी झाली. यानिमित्ताने मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने दीपोत्सव साजरा झाला. त्यामुळे हा परिसर रात्रीच्या वेळी उजळून निघाल्याचे दिसून आले.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com